# राधा कृष्ण गीत



कवि भोजराज पाटील

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २९०८

REFBK-0020044
REFBK-0020044

२१५८ काव्य

२००४४
२३।११।५४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ........ दि: ........
क्रमांक ........ नोंद दि ........

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. २००४४
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २००
(स्थळ प्रत)

# राधा-कृष्ण गीत

भोजराज पाटील

REFBK-0020044

प्रथमावृत्ति १९६९

किंमत तीन रुपये

प्रकाशिका :
सौ. विमल भागवत राणे
" अशोक प्रकाशन "
सावदा जि. जळगांव.

मुखपृष्ठ चित्रकार :
लोकमान
मुंबई.

अनुवाद, नृत्यांकरण, ध्वनीमुद्रक, नभोवाणी
वितरण आदि हक्क कवि स्वाधीन.

मुद्रक :
आर. के. मूर्ति
महाराष्ट्र पेपर्स प्रा. लि.
अत्रे आर्टस् शिवशक्ती,
वरळी, मुंबई १८.

# " अर्पण-पत्रिका "

भारतांत ज्यांनी भारतवासीय जनतेचें जीवाचें रक्षणाकरितां, मालमत्तेचें संरक्षणांकरितां तसेंच शांतता प्रस्थापीत करण्यांकरितां, आपले मौलीक प्राण खर्ची घातलें. त्या ज्ञात, अज्ञात पोलीस सहाध्याभी मित्रांचें चरणी माझी सहावी वाङ्मयीन कलाकृती " राधाकृष्ण-गीत " मी प्रेम भावाने अर्पण करितो. त्यांचे आत्मबलीदानांतून साहित्य-स्फूर्ति घेऊं इच्छितो.

कवि : भोजराज पाटील
पो. सबूई. सी. बी. कंट्रोल
सी. आय. डी.
मुंबई.

## —: अनुक्रमणीका :—


| | |
|---|---|
| राधाकृष्ण गीत | १ |
| राजा-राणी | ६ |
| माऊली | |
| भोजूबुवा आमुचें नांव | ७ |
| आधुनिक कवि | ८ |
| कुणांस म्हणावें राम | ९ |
| निवडणूक गीत | १० |
| आंतर मन | ,, |
| कनिष्ट पोलींस अधिकारी | ११ |
| कर्मयोगी | ,, |
| हाचि वर देगा देवा | १२ |
| उच्चभ्रूंना बदलायाचें | १४ |
| नौकरी | १५ |
| पाऊले ज्ञानाकडे वळली | १६ |
| पाहिजे अधिष्ठान प्रभूचे | १७ |
| प्रियतमा | ,, |
| भारताची अशीच रीतभात | १८ |
| वैरांगीनी | १९ |
| साम्यवादी आय्या | २० |
| प्रेम | ,, |
| जा जा आपुल्या घरीं | २१ |
| धनांधांना येतो आजार | २२ |
| देव खिलाडी खिलाडी | २३ |
| केशवसुत हळहळले | २४ |
| उच्चभ्रू राक्षस | २५ |
| गायन | ,, |
| ज्ञानमय ज्योर्तिप्रकाश | २६ |
| संत तुकाराम | २७ |
| दर्पण | २८ |
| लग्नाचा अजब सोहळा | २९ |
| मनी वसे ते स्वप्नी दिसे | ३१ |
| जन्मा येते श्रमिकांची कविता | ३२ |
| गुलाबाचें फूल | ,, |
| कृष्णार्पण | ३३ |
| जीवनसार | ३४ |
| असूर | ,, |
| शिष्टांचा महाकवि | ३५ |
| स्वप्न मंजीरी | ३६ |
| मागची आठवण होता | ३७ |
| आधुनिक कवि मंडळ | ३९ |
| बोला सावधान | ४० |
| हा भारत असे कुणाचा | ४१ |
| राधिका | ४५ |
| कुणास म्हणावें लेवा | ,, |
| कविता | ४६ |
| आखाडा | ४७ |
| आम्ही पाहिला देव | ४८ |
| निवडणूक महिमा | ४९ |
| भारतीय संस्कृति | ५० |
| तुम्हांपाशीं आम्हीं येवोनिया | ,, |
| काय ? | ५१ |
| लयला मजनू | ५२ |
| कवि भोजचं कौतुक जगान | ,, |
| का करावं ? | ५३ |
| डोळे उघडा श्रमिकांनो | ५४ |
| श्रमिक राज्य बुडतांना | ,, |
| डोळ्यातून अश्रू गाळावं | ५५ |
| आदर्श संसार | ५६ |
| श्रमिक जागृति गीत | ५७ |
| चंद्रकोर आशेची | ५८ |
| प्रश्न श्रमिकांनीच आहे | ,, |
| सोडवायचा | ५९ |
| पेन्शनर | ६० |
| स्वर्ग आणि नर्क | ६१ |
| प्रेमाची कहाणी | ६२ |
| दास प्रभूचा | ६३ |
| माय बाप सरकार | ६४ |
| प्रकट होऊनि नासावें ! | |
| हे बरें नव्हे ! | ,, |
| जगा तुझी सारी तऱ्हाच न्यारी | ६५ |
| सावधान | ६६ |
| संतकृपा मजवर झाली | ६८ |
| कवि आणि कविता | ६९ |
| कवितांजली | ७७ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २००४४
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# निवेदन

मला माझं बाळपण चांगलं कळतं. तरुणपणांतील एक एक गोष्ट चलच्चित्रपटांप्रमाणें डोळ्यांसमोर उभी रहाते. लग्नाचा मंगल सोहळा आठवतो. पहिली मुलगी झाल्याचा आनंद स्मरतों. लागोपाठ सहा मुलीं, चार मुलगें, नातू, नाती डोळ्यासमोर खेळतांना दिसतात. अति संततिचा व्याप नको कधीं कधीं त्रास मनाला स्पर्श करितो. त्यानंतर माझे खाणारें, मला खाऊं घालणारें शेंकडो मित्र हमामा घालतांना दिसतात. मजजवळ पैसे उसनवार मागणारे, पैसे उसनवार देणारे, याचक, सावकार भाऊबंद येतात. सोयरिक संबंध जुळवण्यांसाठीं कांहीं नातेवाईक विचार विनिमय सल्ला मसलत करूं बघतात. किती मजेचे प्रसंग आहेत. जीवनाचा प्रमूख भाग ह्यालाच म्हणतां येईल. प्रापंचीकदृष्ट्या मी मुलखावेगळा गणला जातो. कुणी माझें घरांत यायची बोलीच मला किती किती आनंद होतो म्हणून सांगू. भुकेलेल्याला अन्न मिळाले अगदीं तसेंच समजावें. "बरा सांपडला" न कळत माझें तोंडून उद्गार निघतात. मग आम्हांला स्फूर्ति लाभते. चेतना जागृत होते. जीभ वळवळ करते. देश, देवभक्ति सुरूं होते. पात्र, अपात्र भान नसतें. मी सारखा बोलत असतो. ऐकणारा गुपचूप असतो. तो मंत्रमुग्ध होतो. असें कसें म्हणतां येईल. आम्ही शुद्धित नसतो. आमुचे साहित्यवेडाचा झटका वाढतच जातो. घरमालकीण जेव्हां रागावते तेव्हां पारा एकदम खालीं उतरतो. आम्ही डोके खाजवितो. विचार करूं लागतो. गाणें रडगाणें, कथा रडकथा, कादंबरी सुताचे चऱ्हाट समजले जाई पावेतो विणत बसायचें नसतें. जगाला चालण्यांकरितां काढलेला आमुचा पायांचा कारखाना बिगर डोक्याचा, बिनबुडाचा, पोकळ ठरतांच मी ओशाळतो. खजील होतो. घरीं आलेला पाहुणा त्याची षोडचोपचारे पूजा, जेवणखाण करावयाचें असते. बोलाचीच कढी बोलाचाच भात. शब्दांची, साहित्यचर्चेची कांहीं जरूरत आहे का ? पाहुण्यांवर नक्कीच अन्याय झाला. माझ्या हातानेंच माझे तोंड झोडून घेतो. पांडुरंगा कृपा करून ही साहित्य

निर्मीतीची दुर्बुद्धी देऊं नको. माझ्या जीजाईला तरी आवडत नाहीं. तिला राग येईल असे माझे हातून घडूं देऊं नको. साहित्याच्या रोगामुळें मी नेहमीच बेचैन रहातो. मरण्याची भीती नाहीं. साचलेले पित्त तोंडावाटे बाहेर पडल्यां-वर मनुष्याला बरें वाटते. अगदीं तसाच हा प्रकार आहे. प्रकाशनाच्या वाटेवर पुस्तक चालूं लागतांच रसिकवाचकाशीं एकांतवास, हितगूज, गप्पागोष्टी करा-व्याशा वाटतात. माझी तळमळ ही मळमळ ओकारी वांती ठरतांच वाचकाला शिसारी आली का! शुश्रुषा करावीशी वाटली. मला कळत नाहीं, कांहीं साधन पण नाहीं. जे घडते ते सत्य सांगावेसे वाटते येव्हढे खरें. मी येरवड्याला पाठविण्यांला योग्य असा वेडा आहे का! वेड लावणारा वेडा आहे. रसिक वाचकांना मी न्यायदेवतांच मानतो. त्यांचेच हातांत माझी प्रसिद्धीची सुत्रे आहेत. दोरीवर माझी बाहुली करून ते मला जसें नाचवतील तसें नाचणें क्रमप्राप्त आहे. वाचकांनी मला निंदावे, वानावें मला भलताच राग लोभ नाहीं, रसिक वाचकाइतके जगांत मला कुणीही प्रिय नाहीं.

माझा जन्म ता. १८।२।१९१७ रोजी एका खेड्यांत झाला. बालपण कसबे गांवांत गेले. लहाणपणांपासून सार्वजनीक जीवन, कामाची आवड होती. कळते तेव्हांपासून वाचन नियमीत करीत आहे. आतां पावेतो वाच-नांत खंड पडलेला नाहीं. गरिबी पांचवीला पुजल्यानें मराठी चौथे यत्तेपासून गवंडी, सुताराचें हाताखाली चार आणे रोजाने कामाला जात होतो. शनिवार, रविवारचें सुटींत शेतांत काम करीत होतो. दिपवाळी, हंगाम, उन्हा-ळ्याचे सुटीत दिवसांचे १८ तास राबत होतो. आतां आम्हीं त्रेपन्न वर्षांत पदार्पण केले आहे. संसाराला आतां ३५ वर्षें झाली आहेत. पोलीस खात्यां-तील नोकरीला ३० वर्षे पूर्ण झाली आहेत. पोलीस सब. इन्स्पेक्टर म्हणून जनसेवा, श्रमिकसेवा, साहित्यसेवा करीत आहे.

लहाणपणापासून निर्व्यसनी आहे. निर्व्यसनानंतर संयम, नंतर ज्ञान, नंतर प्रकाश, नंतर परमेश्वर भेट एक एक पायरीने चढत आम्ही ज्ञानी बनलो आहोत. खडतर तपश्चर्या, पोलीस खात्याचा अनुभव, राजकारण, धर्म समाजसुधारणेचा अभ्यास करून आम्ही २५ पुस्तकें लिहिली आहेत. १९५१ ला अदलाबदल कादंबरी १९५४ काळी सावर १९६४ पंचामृत १९६५ चौरंग

कथासंग्रह १९६६ अमर गीत कविता संग्रह प्रसिद्ध झालें आहेत. बहुतेक पुस्तकें लोकांनीं वाचल्याने आमुचे लाखो वाचक मित्र बनले आहेत.

साहित्याचें प्रमूख ६ प्रकार आहेत. कथा, कादंबरी, कविता, निबंध टीका. पैकी ५ भागात लिखाण केले आहे. एक तरी नाटक लिहिल्या शिवाय मरायचं नाहीं, जिद्द कायम आहे. आम्ही मराठी, हिंदी, उर्दू भाषेतून लिखाण केले आहे. धर्म, राजकारण, समाज सुधारणा तीनही विषयाची गोडी असल्याने साहित्यात बेमालूम डोकावतात. समाज सुधारणा राजकारण मागे पडले. धर्माचा हात हातांत घेऊन संतपरंपरा चालवीत पुढील आयुष्य जगावे हा अंतीम हेतू आहे. परमेश्वर मनुष्यरूपाने भेटला. दिसला. जाणवला अनुभवला संकटी धांवून आला. सखा मित्र ठरला. उघड्या डोंळस वृत्तीने बघीतल्याने जीवनात सौख्य, आनंद, समाधानी, शांतो काठोकाठ भरून गेली. उठल्या बसल्या देवाची आराधना करून त्याला बोलवायचे, राबवून घ्यायचे व आपले महत्व वाढवायचे कंटाळा आला. रामागडी समजून आम्हीं देवाला मुक्त केले. आम्ही पण मुक्त झालो.

त्यामुळे साहित्याचे वेड वाढतच चालले कोणतेच व्यसन नसल्यानें हेंच व्यसन जडले. आंगात संचरलेला गार्की स्वस्त बसू देत नाहीं. झोपेतूनही उठवितो. आणि लिहिणे भाग पाडतो. अशा प्रकारे जीवाची आट्यापीट्या रक्ताचे पाणी कशाकरिता केले जात आहे. लहानपणापासून कष्टावर श्रद्धा असल्याने कष्टकऱ्याचे करिता साहित्य निर्माण करावे असे वाटत आहे. साहित्य निर्मितीत प्रसिद्धी नसली तरीं यश मिळाले असे मी मानतो. नौकरीत मात्र अपयश दिसून येते. कष्ट, कर्तव्य, ईमानदारी, हुशारी, सचोटी, बिश्वासूपणा, बुद्धीच्या तागड्यात टाकून जेव्हा मी बढती पगारवाढ मागू लागलो तेव्हां सर्वच वरिष्ठांनी माझे तोंडाला आशेची पाने पुसून अश्रू पुसले. ध्येय आणि व्यवहार ह्याचे अहिनकूलचे नाते आहे. मला कळून चुकल्यामुळेच मी निर्धास्त, शांत होतो.

कोणताही लेखक त्या त्या काळाचा, भागाचा देशाचा मार्गप्रवर्तक समाजसुधारक, निसर्गनिर्मिता, धर्म, राजकारण, समाजसुधारणेचा प्रचारक ठरतो. न्यायदेवता, आदर्श, पुरुषोत्तम, महाकवि, सत्यं, शिवं, सुंदरम्चा मंत्र

घोषित करणारा ऋषि मुनी ठरतो. मला अगदी छान कळतें. मला जनतेसमोर उभे करण्यांत कां आले नाहीं. मला चांगले कळून चुकले आहे. मी पोलीस अधिकारी आहे. साहित्यातील चोरांना मी पकडले आहे. माझी कुणाबद्दल तक्रार नाहीं.

दारु म्हटली तर ५/६ तासाची नशा ठरते. परंतु लिखाण हे चोवीस तासाची, अंताची अनंतात विलीन होईपावेतोची धूंद दिसते. सोडलं तर पळतं धरल तर चावतं. अगदी उलट प्रकार साहित्यांत दिसतो. ही उन्मनी अवस्था सोडली तरी पळत नाहीं. चावू नको म्हटलं तर चावल्याशिवाय रहात नाहीं. गरिब, श्रमिक, खेड्यांतील लेखक फारच फार दुर्दैवी ठरतो. कुत्रा चावला तर डॉक्टर पेशंटला इंजेक्शन देतो, मलमपट्टी करितो. परंतु श्रमिक लेखक म्हटल्यावर प्रत्येकजण कुत्र्याप्रमाणे धांवून लेखकाला धक्का मारून हांकलून देतो. गरिब बिचारा लेखक वाचकाच्या दरवाज्याजवळ आश्रय बघतो. पुस्तक म्हणजे झोपेचे साधन. तोंडावर पुस्तक घेऊन घोरणारे कुंभकर्णी वाचकाचा अवतार बघून तर तो पुन्हां पळतच सुटतो. आतां राजरस्त्यावरून चालतांना "सुटलो" असे म्हणतो तर मानेची घट्ट पकड लक्षांत येतांच थर थर कांपतो. "पुस्तक छपाईचे पैसे टाका!" छापखाना मालकाचा आवाज म्हणजे यमाचे बोलावणे. त्यावेळी पोटकपाटी लागलेला कुलंगी कुत्राही लेखकाचे हाल खात नसतो. प्रसिद्ध पुरुष पांढरपेशीय लेखक त्याची निर्भत्सना करण्यांतच धन्यता मानतात.

स्वार्थ परमार्थ, भोग उपभोग, जात, धर्म, राजपक्ष, धर्म पंथाचे पंख मला कुठलेंच पंख नाहीं असे म्हणतां येणार नाहीं. गरुडाची झेप आकाशांत मारतांना आमचे मनाचे रॅकेट ध्रुवताऱ्याशी हस्तांदोलन करून आले आहे. सिंहाचा पराक्रम गाजवितांना हिंसाशरण आल्यावरच तिला जीवदान दिले आहे. प्रेमाचें झाडाची फळें चाखतांना केव्हा केव्हां सत्ताधारी, संपत्तीधारी ह्यांना दरिद्री समजूनच हेटाळले आहे. आम्ही जो व्यापार केला तो भक्तिचाच केला. असे म्हणायला कांहीं हरकत नाहीं.

आम्हांला अज्ञानांत फुटलेले गरुड पंख ज्ञानांत केव्हां गळाले. ते आमच्या देहाला ठाऊक आत्मा अमृत पीत मग्न होता. मस्त होता. पस्तीस

वर्षे आम्ही संसार केला. तीस वर्षे नौकरीला झाले. सुखाची एक बाजू मोठ्या दिमाखाने मांडतो. परंतु आमचे बरोबरीचे मित्रांनी आम्हांला सर्टीफिकेट देतांना काय काय विशेषणें अर्पण केली. आम्ही काय कमाविले गमविलें ह्याचा प्रचार केला. ती दुसरी बाजू सांगणें क्रमप्राप्त होते.

"अकिंचन, दळभद्रा, कर्मदरिद्री, कम नशिबी, अव्यवहारी, अडाणी, भोळा, बावळट, वेडापीर दिसायला देखणा, स्नेहाला चांगला, टाकावू नाहीं जरा हेकेकोर आम्ही आहोत तर संसार चालतो. नाहींतर गाडी कधींच खड्ड्यात गेली असती."

आम्ही ३० वर्षात थोर समजून कांहीं साहित्तीक पुढारी, प्रसिद्ध पुरुष अधिकारी लोकांचे बंगल्यावर गेलो. पोर समजून त्यांनी आम्हांला बोंडलाने दूध पाजलें चव बघांच जरा-"लेखक अद्याप बच्चा आहे. कल्पना अचाट पण प्रयोग कुचाट आहे अनुभवाला धार पण अनुभूति बोथट आहे. कथेची मांडणी छान पण बांधणी ओबड धोबड आहे. कादंबरीचे तंत्र ठाऊक पण मंत्राचा विसर पडलेला दिसतो. कवितेला गरुडाची झेप आहे. पण गरुड आंधळा दिसतो. कथा दुधसाखर वाटते. पण पुढे मीठाचे खड्याने नासली आहे. कादंबरीचें कोंदण सोन्याचे खरे पण हिरा नकली भासतो. शुद्ध लेखन व्याकरणाचा भाग कच्चा आहे. पोलीस आणि साहित्य मनाला पटत नाहीं. लेखक आणि पदवी नाहीं लेखन वाचावसं वाटत नाहीं. श्रेष्टींचा आशीर्वाद, थोर साहित्यिकाची प्रस्तावनाच नाहीं. तेव्हां लेखनाला कांहीं अर्थ नाहीं. सरकारी नौकरी करावयाचे सोडून साहित्तीक बनायचें सांगीतले कुणी वेडे-चाळे करावयाला. सरकारची परवानगी नसतांना कांहीं लिहिणें म्हणजे एक पाय तुरुंगांत टाकणें होय. सत्ता, संपत्ती जोडल्यावर भलेही ५० ऐवजी ५ पुस्तकें लिहावी. शिष्टांचे पंगतीत बसायला त्याशिवाय मिळणार नाहीं. गुरु बिना ग्यान नाहीं. गुरु म्हणजे भटजी ग्यान म्हणजे शेटजी लक्ष्मी म्हणजे सरकारमान्यता. सरस्वती म्हणजे बाजारभाव. व्यापारी साहित्यांतील परवली शब्द पाठच करायला हवीत.

जनसेवा, देशसेवा, भक्ति, प्रेम, अहिंसा, देहआत्मा, परमार्थ, त्याग हे शब्द कल्पतरु, कामधेनू चिंतामणीप्रमाणे साहित्यांत ओवायची असतात.

प्रत्यक्षांत त्याचा केलेला वापर म्हणजे प्रसिद्धी पैसा सत्ता अधिकारपदाला तिलांजली देणे होय.

समाजवाद, साम्यवाद, भांडवलशाही झोटींगशाही, झब्बूशाही, पोलादी चौकट साहित्यांचे चौकटीत बसवायची असतात. आपण नामानिराळे रहायचे. कोणताही वाद उपस्थित करावयाचा असतो तुंबडी भरतांच बाजूला सरावयाचें व भाषणापुरते जनतेसमोर यावयाचें. भांडतांना मुद्दा दाखवायचा असतो. मुद्दा बाजूला सारून तडजोडीचा हात पुढे पुढेच करावयाचा असतो. बक्षीस पुरस्कार, पदवी हवी असल्यास साहित्य सेवेपेक्षां साहित्यकाराची सेवा करून पुढे जायचे असते. सरकार दरबारांत पत वाढवायची असते.

श्रम, श्रमिक, श्रमिक साहित्य साराच खुळचट प्रकार वेडगळ चाळे दिसतात. कितीही झाले तरी भारत हा भारतच रहाणार आहे, आणि राज्य बुद्धीजीवी भटजी व व्यापारी शेटजीच चालविणार आहेत.

स्वतःला चौकस, डोळस, ज्ञानी, बुद्धी सागर, शास्त्री, पंडित, वेदो-नारायण, आचार्य, प्राचार्य, डॉक्टरेट, साहित्यसम्राट समजणारे शहरवासी मित्रांचे कान उघाडणीने, कान टोचण्याने आमुचे ज्ञानांत भर पडली. प्रकाश पडला. मार्ग सापडला, धडा शिकलो. असे म्हणता येणार नाहीं. त्यांचे तत्त्व-ज्ञान त्यांना लखलाभ. त्यांचा पिंडच मुळी श्रमिकांचे टाळूवरचे लोणी खाऊन पोसलेला आहे. चूक आमची आहे. आम्ही अंधश्रद्धेने, अंधभक्तीने त्यांचे साहित्याकडे बघीतले.

भारतात हजारो वर्षांपासून ज्यांनी राज्य कारभार हांकतांना श्रमिकांना अज्ञानांत चक्रांत टाकणारेच साहित्य निर्माण करण्यांत प्रगति दाखविली. ते श्रमिकांना ह्या प्रजासत्ताक राज्यांत लोकशाहीत जवळ घेतील. समानतेचा हक्क देतील आमुचा विश्वास नाही.

भारतांतील कोणतीही लायब्ररी बघा शेंकडा ८० टक्के पुस्तके भटजींनी लिहिलेली आहेत. २० टक्के शेटजींनी लिहिलेली आहेत. साहित्य हे जन जागृति प्रचाराचे साधन म्हटले तर उच्यवर्णिय उच्चभ्रूंचे साहित्य प्रचारांतून काय जन्माला येते. सांगतो. "भारतांत आणिक शेकडों वर्षे लार्डोंचे राज्य

राहो !" असाच सूर नीघतो. आणि म्हणूनच दूरवरचा विचार करून श्रमिकांचे साहित्य श्रमिक लिहितील हा प्रथम आवाज महाराष्ट्रात आम्ही काढला. आम्हांला साद मिळाली नाहीं दुःख नाहीं. सादची, साथची मुळीच जरूरत नाहीं. हा भारत श्रमिकांचा हे सिद्ध करण्यासाठीं शेवटचा श्वास सोडीपावेतो लिहीत रहाणार. आमुच्या श्रमिक साहित्य गाडीचा पहिला व दुसरा डबा काढूनच टाकणार आहोंत, त्यामुळें त्या डब्यांत कोण प्रवासी होतें आम्हांला त्याची शहानिशा करावयाची जरूरत भासणार नाहीं. शष्ठंप्रति:शाठयं हा आमचा धर्म नाहीं. असहकार ह्या तेजस्वी हत्यारानेच आम्ही ध्येय गांठणार आहोंत. उच्चभ्रूंचे साहित्याने आम्ही फसणार नाही. दिपणार नाहीं. चर्चा पण करणार नाहीं. अहो त्यांचा आमुचा मुळी संबंधच रहाणार नाहीं. आमुचे अन्नावर भलेही ते पोसले जावो ! त्यांचे विचाराशीं आम्ही सहमत होणार नाहीं. ह्या शिष्टांनी, दुष्टांनी जातियवादी साहित्याला जवळ घेतले. परंतु श्रमिक आणि श्रमिक साहित्याबाबत तोंडांतून अवाक्षर काढिले नाहीं. जेथे श्रमिकांचे साहित्यच नाही तेथे प्रचार कोण करणार. प्रचारच नाहीं तेथे शेतकरी, कामकरी राज्य कसे निर्माण होणार. श्रमिकांचें राज्यच नाहीं तर ९० टक्के लोक कसे सुखी होतील. का देशांतील बुद्धिजीवी, बुद्धिवादी, जडवादी लोक ते निर्माण करणार आहेत. माझे रसिक वाचकांनी आमुचे मताचा विचार करावा. मत पटले तर प्रचार करावा. आमुचे पाठीमागे कोणी नसले तरी आम्ही पुढेच जाणार पुढे टाकलेले पाऊल प्राण गेला तरी मागे घेणार नाहीं.

आमुचे श्रमिक साहित्य कष्ट, उत्पादन, विकेंद्रीय करणांतून जन्माला येईल. भारतांतील कोट्यावधी श्रमिक जनतेचा आशीर्वाद त्याला मिळणार आहे. शिष्टांचे साहित्याप्रमाणे एक ना धड भाराभर चिंध्या मुळींच रहाणार नाहीं. श्रमिक हित, देशहित साधीत संतपरंपरा चालविणारे आध्यात्मिक तत्वज्ञानाने प्रेरित राहील. भाषा साधी, सरळ, सोपी गोड राहील.

आमुचे तत्वज्ञानाप्रमाणे श्रमिक हित साधणारा जागृति निर्माण करणारा "राधा कृष्णगीत" संग्रह प्रसिद्ध झाला आहे. सहृदय, रसिक, श्रमिक वाचक सक्रिय महानुभूति दाखवतील आम्ही आशा बाळगतो.

कृपा करून भटजी म्हणजे ब्राह्मण असे समजू नये. भटजी म्हणजे

शेटजी राज्याचा प्रचारक असा अर्थ समजावा. शेटजी, भटजींची जात, धर्म एकच आम्ही मानतो. राधाकृष्ण गीत कविता संग्रह प्रसिद्धीचें कामी खालील सद्ग्रहस्थांनी उत्तेजन दिले आहे. आम्ही आभारी आहोत.

१) श्री. पांडूरंग गुरुजी खिरोदे
२) श्री. भागवत एस. राणे शेतकी अधि. जळगांव
३) श्री. रुपा पाटील, वसंत टेलरिंग फर्म जळगांव
४) श्री. डॉ. जी. डी. बेंडाळे जळगांव
५) सदाशिव सोना नेभाडे खानापूर
६) वेडू पाटील मनमोहन मेडि. स्टोअर यावल
७) श्री. नारखेडे मुख्या. हाय. खानापूर
८) श्री. कोल्हे मुख्या. हाय. मस्काबद
९) श्रीमति जाईबाई चौधरी मुख्या. मु. शाळा सावदे
१०) श्री. गोविंद चावदस कुरकुरे सावदे
११) कै. शाहीर अण्णाभाऊ साठे घाटकोपर मुंबई
१२) श्री. एन. एल. आकूत पो. इन्. सी. बी. कन्ट्रोल सी. आय्. डी. मुंबई
१३) श्री. टी. एम्. पाटील सी. पी. इन्स्पेक्टर महासमुन्द
१४) श्री. ओ. एम्. पाटील हेडक्लार्क शेतकी खाते. मांजरी फार्म पुणे
१५) कै. आचार्य प्र. के. अत्रे; शिवशक्ति मुंबई

# राधाकृष्ण गीत

वहाते गंगा वहाते यमुना संगमरवरी घाट ॥
प्रेम भक्तिचा थाट माट सुंदर तापी कांठ ॥ १ ॥

गांवांबाहेर वहाते नदी कांठांलाच कृष्ण मंदिर ॥
देवाचे खालीं नांव कोरिती श्रीमंत, सावकार ॥ २ ॥

दहिदूध लोणी देव विकतो नीच जात नीच कुळी ॥
ब्राह्मण ठरताच देवता आग लागली गोकुळी ॥ ३ ॥

जे न देखे रवि तेच दाखवी किंचीत् कवि ॥
कविता प्रचारातुनि फुटते पेशवाईला पालवी ॥ ४ ॥

पवित्र गंगा पवित्र यमुना भरला प्रेमबाजार ॥
राधाकृष्ण दर्शनासाठी येति लहान सान थोर ॥ ५ ॥

राधा राणी मधूर वाणी रुपवति बी. ए. पास ॥
उच्च जात नीच रुढि कपाळी वैधव्य वनवास ॥ ६ ॥

टीक् टीक् आवाज टायपिस्ट राधा आज भुलली ॥
मधूर मंजूळ मुरलीचे सुराने मती धुंद जहाली ॥ ७ ॥

मदन मोहक शाम सुंदर स्टेनो एम्. ए. पास ॥
कृष्ण नामे शोभला राही साहेबाचे जवळपास ॥ ८ ॥

अघटित घटना दुर्दैवि महिमा कृष्ण झाला विदूर ॥
गुलाब बकुळीला बघुनि सरतो लग्नापासून दूर ॥ ९ ॥

राधा गोरे कृष्ण मोरे काम करिती एका ऑफिसांत ॥
पांढरपेशे जीवन जगती सांपडलें प्रेम पाशांत ॥ १० ॥

काम करावे पोट भरावें जाति, धर्म नियम पाळावे ॥
जात ब्राह्मण, मराठा समाजबंधन सोईनुसार आळवावे ॥ ११ ॥
"थकले ग आई ! कर चहा जाते कृष्ण दर्शनाला
भारी लागट लोचट साहेब सोडीतो साडे पाचाला" ॥ १२ ॥
रेशमी परकर फीट बॉडी जंपरवरवर नायलान साडी ॥
झिर झिरीत आकाशी रंगातुनि चमके सुंदर बॉडी ॥ १३ ॥
राधा बघते आरशांत आपुले सुंदर रूप ॥
कृष्णाने काढिले हात पुढती झाली एकरूप ॥ १४ ॥
कृष्ण नामाची लावी टीकली लाज, लज्जा सोडून ॥
बुरसटलेल्या सनांतन्यांना दावि आंगुठा वेडावून ॥ १५ ॥
वहाते गंगा वहाते यमुना संगमरवरी घाट ॥
प्रेम भक्तिचा थाटमाट सुंदर तापी कांठ ॥ धृ ॥
"यकला मामी करा चहा ! जातो बाहेर फिरायला ॥
वरणाला द्या फोडणी हातानेच भरवा बकुळीला" ॥ १६ ॥
कृष्ण सावळा शोभतो सूट टेरलीन टेरीकॉट ॥
झाला देहभान आरशांत बघतो राधा अंतरपाट ॥ १७ ॥
निघाला कृष्ण प्रेमळमूर्ति खाऊ देई बकुळीला ॥
झाला उशिर ध्यानि येता प्राण कासावीस झाला ॥ १८ ॥
वहाते गंगा वहाते यमुना संगरमरवरी घाट ॥
प्रेमभक्तीचा थाट माट सुंदर तापी कांठ ॥ धृ ॥
राधा पथ चालते हळू कृष्णासाठीं संकेत ठरलेला ॥
कधी कृष्ण रेंगाळतो टपरीजवळी चघळीत पानाला ॥ १९ ॥
देवाचे नांव आपुलं गांव घडते राधा कृष्ण दर्शन ॥
निर्गुण देवा समोर बोलते सगुण आंतरमन ॥ २० ॥

प्रियकर कृष्ण प्रेयसि राधा नाते जोडिती पतिपत्निचे ॥
जो जसा पाहे तसा भाव होते संबंध प्रेमाचे ॥ २१ ।

देवता राधेकडे पाही कृष्ण तुटला मोहपाश ॥
कृष्णमूर्तिकडे पाही राधा जीवनी अमृत आस ॥ २२ ॥

प्रेमाचे वस्त्र विणीतसे जादूगार काळ ॥
राधाकृष्ण धूंद सदा दिसती सांजसकाळ ॥ २३ ॥

वहाते गंगा वहाते यमुना संगमरवरी घाट ॥
प्रेमभक्तिचा थाटमाट सुंदर तापी कांठ ॥ धृ० ॥

वहाते तापी थंड हवा टीपूर चंद्रप्रकाश ॥
तरुणांची भूक कोण सांगणार जेवा सावकाश ॥ २४ ॥

धनऋण विद्यूत तार जोडिता वहाते वीज जोरांत ॥
कृष्णाचा हात राधेच्या हातांत रक्त सळसळते जोसांत ॥ २५ ॥

पंचप्राण व्याकूळ राधा बोलते गद्गद स्वराने ॥
कृष्णा असा कसारे वेडा तूं वाग विचाराने ॥ २६ ॥

नाथा! तू तरु मी लता तुझ्या आधाराने चढायचे ॥
वहावीतो उलटी गंगा पाणी स्वर्गी कां न्यावयाचे ॥ २७ ॥

जग वर्तुलाकार जगा पाठोपाठ खूप प्रगति बोलायचे ॥
ऐकावें जनाचें करावें मनाचें सौख्य भोग भोगायचें ॥ २८ ॥

जग चालले पुढे दिसतो मागे गीतेने केले वेडेपिसे ॥
तूं मास्टर ऑफ आर्ट परी साधा भोळा दिसतसे ॥ २९ ॥

कृष्णा डोण्ड फिअर! आय् याम लुपवती भव ॥
टच करूनही तुला न येतो चेव, तरीच येते किव ॥ ३० ॥

लुपवती देवता शस्त्रक्रियावीर ठरतात ब्रह्मचारी ॥
तूं भोग मला मी भोगते तुला काळ्याबाजारी ॥ ३१ ॥

संभोगाने मन प्रसन्न निरोगी ठरतो योग्यांचा योगी ॥
काया, वाचा, मनें भोगीते तो वीर खरा संभोगी ॥ ३२ ।

मेले सारे आचारी, विचारी उरले फक्त विकारी ॥
उच्च नीच, स्त्री पुरुष, भेद संपले वदतात पुढारी ॥ ३३ ॥

खावें प्यावे मजा करावे त्याग संयम सारे असार ॥
जीवाची मुंबई, मनाची मोटार मध्यें तुझा माझा प्यार ॥३४॥

पर पुरुष स्त्री संभोग पुराणांत सांगतात महापाप ॥
अडाणी जनांसाठी लुच्चांनी बनविला पापाचा साप ॥ ३५ ॥

दुष्ट सुष्ट, पाप पुण्य, हत्यार थोरा मोठ्यांचे ॥
मी टायपिस्ट तू स्टेनो आम्ही खातो कुणाचे बापाचे ॥ ३६ ॥

असतील थोर त्यांचे घरचे कलेक्टर, मिनिस्टर ॥
लोकशाही म्हणजे काय सत्ताधाऱ्यांचीच नार ॥ ३७ ॥

गरिब पितो दारु दारुड्या साहेब ठरतो न्यायदेवता ॥
आम्ही आहोत व्यभिचारी पुराव्याशिवाय दोष लावीता'' ॥३८॥

वहाते गंगा वहाते यमुना संगमरवरी घाट ॥
प्रेम भक्तीचा थाटमाट सुंदर तापी कांठ ॥
मांडीवर डोके लोळत होता कृष्ण मजेने रेतीवर ॥
उठुनी बैसला राधेची धरी हनुवटी करी मान वर ॥ ३९ ॥

"राधा ! प्रेम म्हणजे शरिर, भोग, विलास कोण तुझा गुरू ॥
पशू खातात पितात, संभोगतात म्हणूनच वदतात गुरूं ॥४०॥

नर देह मंदिर, नराचा नारायण असते बनायचे ॥
रौरव नरकांतील किडे कां रात्रंदिवस भोग भोगायचे ॥४१॥

गंगेला मीळाला लेंडिनाला विद्या गर्वाने फुगायचे ॥
जेथे मिळाला तेथे संपला आम्ही ध्येय का सोडायचे ॥४२॥

कलेक्टर, मिनिस्टर त्यांचेवर उगीच कां रागवायचे ॥
देवघर आहे आमुचे पति, पत्निने सजवायचे ॥ ४३ ॥

स्वातंत्र्य म्हणजे कुणाचा पायपोस कुणाचे नसे पायांत ॥
सांगीतले कुणी तुला सर्वांना रहावे लागेल प्रेमबंधनांत ॥ ४४ ॥

लुपवती म्हणजे संतति नियमन असते पाळायचे ॥
धर्म, नीति, कायदा सोडून बेछुट कां वागायचे ॥ ४५ ॥

कष्ट करावें खावें, प्यावे उरलेले ते वाटून द्यावे ॥
वात्सल्यता घरांत खेळवावी प्रथम पाया मग कळस बांधावे ॥ ४६ ॥

राधा द्यावी कृष्ण घ्यावा कृष्ण घ्यावा राधा द्यावी ॥
प्रेम भक्तिचा करावा सौदा भलती काळजी कां करावी ॥ ४७ ॥

जात उच्च नीच रूढी प्रेम ज्योतीने रूढी जाळावें ॥
भगवति सोडुनि स्वतःला लुपवती कां संबोधावें ॥ ४८ ॥

वहाते गंगा वहाते यमुना संगमरवरी घाट ॥
प्रेम भक्तिचा थाट माट सुंदर तापी कांठ ॥ धृ ॥

विदूर कृष्ण विधवा राधा प्रेमाने प्रेम जोडावें ॥
कावळे बगळे वगळुनि लग्नाला राजहंस बोलवावे ॥ ४९ ॥

हृदयी वाहते गंगा दोघे जाऊ या कृष्णमंदिरांत ॥
प्रथम विवाह नोंदणी मग करूं जग जाहिरांत" ॥ ५० ॥

कोण राधा कोण कृष्ण कोणते त्याचे गांव ॥
छापुनि आली ज्याची कविता त्याचे घ्यावें नांव ॥ ५१ ॥

श्रमिकांचा थोर कवि छंद रचना भोजराजाची ॥
मंत्रमुग्ध करितो गायक गांठ पडतां रसिकांची ॥ ५२ ॥

संभोगाने मन प्रसन्न निरोगी ठरतो योग्यांचा योगी ॥
काया, वाचा, मनें भोगीते तो वीर खरा संभोगी ॥ ३२ ॥
मेले सारे आचारी, विचारी उरले फक्त विकारी ॥
उच्च नीच, स्त्री पुरुष, भेद संपले वदतात पुढारी ॥ ३३ ॥
खावें प्यावे मजा करावे त्याग संयम सारे असार ॥
जीवाची मुंबई, मनाची मोटार मध्यें तुझा माझा प्यार ॥३४॥
पर पुरुष स्त्री संभोग पुराणांत सांगतात महापाप ॥
अडाणी जनांसाठी लुच्चांनी बनविला पापाचा साप ॥ ३५ ॥
दुष्ट सुष्टँ, पाप पुण्य, हत्यार थोरा मोठ्यांचे ॥
मी टायपिस्ट तू स्टेनो आम्ही खातो कुणाचे बापाचे ॥ ३६ ॥
असतील थोर त्यांचे घरचे कलेक्टर, मिनिस्टर ॥
लोकशाही म्हणजे काय सत्ताधाऱ्यांचीच नार ॥ ३७ ॥
गरिब पितो दारु दारुड्या साहेब ठरतो न्यायदेवता ॥
आम्ही आहोत व्यभिचारी पुराव्याशिवाय दोष लावीता" ॥३८॥
वहाते गंगा वहाते यमुना संगमरवरी घाट ॥
प्रेम भक्तीचा थाटमाट सुंदर तापी कांठ ॥
मांडीवर डोके लोळत होता कृष्ण मजेने रेतीवर ॥
उठुनी बैसला राधेची धरी हनुवटी करी मान वर ॥ ३९ ॥
"राधा ! प्रेम म्हणजे शरिर, भोग, विलास कोण तुझा गुरू ॥
पशू खातात पितात, संभोगतात म्हणूनच वदतात गुरूं ॥४०॥
नर देह मंदिर, नराचा नारायण असते बनायचे ॥
रौरव नरकांतील किडे कां रात्रंदिवस भोग भोगायचे ॥४१॥
गंगेला मीळाला लेंडिनाला विद्या गर्वाने फुगायचे ॥
जेथे मिळाला तेथे संपला आम्ही ध्येय का सोडायचे ॥४२॥

कलेक्टर, मिनिस्टर त्यांचेवर उगीच कां रागवायचे ॥
देवघर आहे आमुचे पति, पत्निने सजवायचे ॥ ४३ ॥

स्वातंत्र्य म्हणजे कुणाचा पायपोस कुणाचे नसे पायांत ॥
सांगीतले कुणी तुला सर्वांना रहावे लागेल प्रेमबंधनांत ॥४४॥

लुपवती म्हणजे संतति नियमन असते पाळायचे ॥
धर्म, नीति, कायदा सोडून बेछुट कां वागायचे ॥ ४५ ॥

कष्ट करावें खावें, प्यावे उरलेले ते वाटून द्यावे ॥
वात्सल्यता घरांत खेळवावी प्रथम पाया मग कळस बांधावे ॥४६॥

राधा द्यावी कृष्ण घ्यावा कृष्ण घ्यावा राधा द्यावी ॥
प्रेम भक्तिचा करावा सौदा भलती काळजी कां करावी ॥ ४७ ॥

जात उच्च नीच रूढी प्रेम ज्योतीने रूढी जाळावें ॥
भगवति सोडुनि स्वतःला लुपवती कां संबोधावें ॥ ४८ ॥

वहाते गंगा वहाते यमुना संगमरवरी घाट ॥
प्रेम भक्तिचा थाट माट सुंदर तापी कांठ ॥ धृ॥

विदूर कृष्ण विधवा राधा प्रेमाने प्रेम जोडावें ॥
कावळे बगळे वगळुनि लग्नाला राजहंस बोलवावे ॥ ४९ ॥

हृदयी वाहते गंगा दोघे जाऊ या कृष्णमंदिरांत ॥
प्रथम विवाह नोंदणी मग करूं जग जाहिरांत" ॥ ५० ॥

कोण राधा कोण कृष्ण कोणते त्याचे गांव ॥
छापुनि आली ज्याची कविता त्याचे घ्यावें नांव ॥ ५१ ॥

श्रमिकांचा थोर कवि छंद रचना भोजराजाची ॥
मंत्रमुग्ध करितो गायक गांठ पडतां रसिकांची ॥ ५२ ॥

# राजा-राणी

मनी वेणू नाद घुमला ॥
हृदयी वसंत फुलला ॥ १ ॥
राणी राजा येती जवळी ॥
प्रेमे करिती लाडी गोडी ॥ २ ॥
राणी करी गु द गु लीं ॥
राजाची फुलली कळी ॥ ३ ॥
राजा गुपित बोली ॥
राणी रुसून गेली ॥ ४ ॥
राजा हृदय खोली ॥
राणी अधिन झाली ॥ ५ ॥
प्रेम भक्ति फळा आली ॥
ज्योत पेटली अंतराळी ॥ ६ ॥

# माऊली

★

माय माऊली कृपेची साऊली ॥
बायको माऊली प्रेमाची बाहुली ॥ १ ॥
संत माऊली वाट धावली ॥
संसार माऊली उन सावली ॥ २ ॥
विठाई माऊली संकटी धावली ॥
देह माऊली प्रसिद्धि पावली ॥ ३ ॥
आत्मा माऊली अमृत जेवली ॥
कविता माऊली दुनिया दावली ॥ ४ ॥

# " भोजूबुवा आमुचें नांव "

卐

भोजूबुवा आमुचें नांव ॥
वैराग्य असे आमुचें गांव ॥ १ ॥

आमुचे जवळ आहे बाजी ॥
परंतु आम्ही नाहीं पाजी ॥ २ ॥

आमुचें जवळ आहे सोंग ॥
परंतु येत नाहीं ढोंग ॥ ३ ॥

साऱ्या मुलखाचें आहोंत तोंदु ॥
परंतु आम्ही नाहीं भोंदू ॥ ४ ॥

आमुचे जवळ आहे अक्कल ॥
करणार नाहीं विभूति नक्कल ॥ ५ ॥

धर्मांध पंथिय आमुचें नाहींत गुरु ॥
आहोंत, आम्ही आमुचे गुरु ॥ ६ ॥

आमुचे जवळ नमस्कारास नमस्कार ॥
नाहीं दिसणार जादू, चमत्कार ॥ ७ ॥

—००—

# " आधुनिक कवी "

बघा जनहो ! आधुनिक कविची कविता देखा ॥
अभंगवाणी तुकायाची मारीतो भूलथापा ॥ १ ॥

तुकारामाचा शत्रु, श्रमिकांचा काळ, गोरागोमटा ॥
चालतो डोक्याने, हातात सदा, स्वार्थाचा सोटा ॥ २ ॥

उच्चभ्रूंचा मित्र प्रचारक धोकेबाज मोठा ॥
स्वार्थी भोगी जनांला, दावितो पळ वाटा ॥ ३ ॥

आधुनिक कविची किंचित कविता फुग्यात भरलेली ॥
फुटतां फुगा मृत काया दिसते हवा हवेंत विरलेली ॥ ४ ॥

गंगेला मिळाला लेंडीनाला जात गंगा जय बोला ॥
जेथे मिळाला तेथे संपला विद्या गर्गाने फुगलेला ॥ ५ ॥

मंबाजी तुंबाजी, सालोमालो सोवळे गीत गातात ॥
श्रमिकांसाठीं भुरळ मोक्ष श्रीखंडपुरी चापतात ॥ ६ ॥

प्रसिद्ध संघटणा चातुर्याने मंबाजीचा बनविला तुका ॥
तुकयाला ठेवितां भुका त्यामुळें दिसतो मुका ॥ ७ ॥

कवि भोजराज अभंग गातांना वाजतो चौघडा ॥
मंबाजीचा फुटता घडा बाहेर पडतो धिंडवडा ॥ ८ ॥

# "कुणांस म्हणावें राम"

पृथ्वि, आप्, तेज आकाश, वायूचा बनला नरदेह ॥
त्यामध्यें रहातो जीव तोचि आत्माराम ॥
त्यांस म्हणावें राम ज्यांचेशी पडते आमुचे काम ॥
कुणांस म्हणावें राम जो करितो आमुचे काम ॥ १ ॥

पोट पाठीशीं रात्रंदिन करितो काम काम ॥
श्रीमंत वदतात आमुचा गडी राम राम ॥
त्यास म्हणावें राम ज्याचेशीं पडते आमुचे काम ॥
कुणांस म्हणावें राम जो करितो आमुचे काम ॥ २ ॥

रावणाचा काळ देवाचा अवतार ॥
आहे दाशरथी सितेचा अयोध्यावासी राम ॥
त्यास म्हणावें राम ज्याचेशी पडते आमुचें काम ॥
कुणांस म्हणावें राम जो करितो आमुचें काम ॥ ३ ॥

उठल्या बसल्या प्रेमाने करितो राम राम ॥
तोचि ब्रह्मांडनायक आहे शांताराम ॥
त्यास म्हणावें राम ज्याचेशीं पडते आमुचे काम ॥
कुणांस म्हणावें राम जो करितो आमुचें काम ॥ ४ ॥

जेथुनि आम्ही आलो तेथेंची चाललो ॥
कवि भोजराज वदतात बोलो भाई राम ॥
त्यास म्हणावें राम ज्याचेशीं पडते आमुचें काम
कुणांस म्हणावें राम जो करितो आमुचें काम ॥ ५ ॥

## " निवडणूक गीत "

बी. ए. पेक्षां एम्. ए. आहे वरची पायरी ॥
फर्स्ट क्लास फर्स्ट वाल्यांची रहाते सदा ऐट भारी
डेली इन्कम् ज्यांचे आहे रुपये शेंकडो वारी ॥
म्हणावे दे. भ. ह. भ. साहेब, गोवर्धनधारी ॥ १ ॥
निवडून द्यावे अशा शारदा, लक्ष्मी पुत्रांना ॥
मग राज्यकारभार बघा तऱ्हाच नाना ॥
जाती भेद, भाषा भेद, प्रांतभेद अशांततेला येतो उत ॥
साऱ्या फॅसिस्टांना शीघ्र वदतात भारत मातेचे सुपुत ॥ २ ॥
भारती नसे प्रचारक कोणी श्रमिकांचे कैवारी ॥
नाऱ्या, नुऱ्या, पिऱ्या ठरतात उत्पादनाचें वैरी ॥
उच्च वर्णिय, धनलोभि यांचे प्रचारक मंबाजी घरोघरी ॥
कवि भोजराज वदतात द्या निवडून श्रमिकांना बनवा मानकरी ॥ ३ ॥

## " आंतर मन "

जे काय भोगीले भोगायचे राहीले भोगातच ॥
चालले जीवन ॥ १ ॥
जाहिरात बाजीचे जगांत भोगियांनाच राहील ॥
मान सन्मान ॥ २ ॥
आम्ही आहोत श्रमिक संत आम्हांला नकोच ॥
मान सन्मान ॥ ३ ॥
प्रभू वाचेतूनच बोलेल सर्वांशीं आमुचे ॥
आंतर मन ॥ ४ ॥

# " कनिष्ट पोलीस अधिकारी "

आम्ही सरकारी नौकरी केली आमुचे घोडे गंगेत न्हाले ॥
सेवा, त्याग, चाकरी करितांना अटकेला जाऊन भिडले ॥१॥

आम्ही काय केले! केली नाहीं! फसवणूक श्रमीकांचे गळे कापले ॥
कष्ट करून करून थकले शेवटी संत जनाला शरण गेले ॥ २ ॥

प्राप्तिचा अर्धा हिस्सा वरिष्ट बघतात आमुचेकडे अभिलाषेने ॥
आमुचेवर नव्हती सरकारी छाया तरीही रंगली इतिहासाची पानें ॥३॥

आम्हीच घडविला इतिहास श्रमिक, महाराष्ट्र राज्याचा ॥
उमटवीला ठसा गुणांनी चरित्र आणि चारित्र्याचा ॥ ४ ॥

आम्ही कधींच नाहीं म्हटले, " बैल गाभण तेरावा महिना " ॥
अंधश्रद्धा अंधभक्तितून गायीला लुटारूं पेंढाऱ्यांचा महिमा ॥ ५ ॥

नाहीं मिळाली प्रसिद्धि दे. भ. ची, नच कुणी शूर म्हणून वंदीले ॥
देश, धर्मा पायीच आमुचे बढती, संपत्तीचें स्वप्न भंगले ॥ ६ ॥

कवि भोजराज आहेत एक कनिष्ट पोलीस अधिकारी ॥
कधीं कधीं वरिष्ट झुकतांना करितात थोडी तरफदारी ॥ ७ ॥

# कर्मयोगी

आम्हालांच कां कळूं नये अन्न कष्टाचेच खावे ॥
उच्चभ्रूंचेच ओंजळीने पाणी कां प्यावे ॥ १ ॥

मेष, वृषभ, कुंभ, भविष्य आमुची धनरास ॥
उच्चवर्णिय भूलथाप, आम्ही ठेवीतो विश्वास ॥ २ ॥

आम्ही आमुचे गुरु सत्य शोधीत जावे ॥
अनुभव अनुभूतीने सन्मार्ग आचरावें ॥ ३ ॥

सुधारणा धर्म, राजकारण हाच ज्यांचा धंदा ॥
कष्टकरी बनविला बैल त्यांचेच पडतो फंदा ॥ ४ ॥

जे जात्यंध, धर्मांध त्यांचे आम्ही कां ऐकावे ॥
सूर्य बघण्यांसाठीं कां हातांत दिवा घ्यावे ॥ ५ ॥

स्वार्थी, धूर्त खातात मिष्टान्न टाळूवरचे लोणी ॥
आम्ही अंध पडतो चक्रांत पाठीवरती गोणी ॥ ६ ॥

कवि भोजराज प्रार्थितो अहोरात्र कष्ट करावें ॥
कष्टाने गाळुनी घाम त्यागी कर्मयोगी बनावे ॥ ७ ॥

# हाचि वर देगा देवा

★

हाचि वर देगा देवा ॥
शेतकरी जागृत व्हावा ॥ १ ॥

हाचि वर देगा देवा ॥
श्रमिक कवि व्हावा ॥ २ ॥

हाचि वर देगा देवा ॥
कामकरी गायक व्हावा ॥ ३ ॥

हाचि वर देगा देवा ॥
मजूर प्रचारक व्हावा ॥ ४ ॥

हाचि वर देगा देवा
कष्टकरी निवडून यावा ॥ ५ ॥

हचि वर देगा देवा
राष्ट्रपति हलधर व्हावा ॥ ६ ॥

हाचि वर देगा देवा ॥
महामंत्री चक्रधर व्हावा ॥ ७ ॥

हाचि वर देगा देवा ॥
राज्य कारभार मराठी व्हावा ॥ ८ ॥

हाचि वर देगा देवा ॥
भेदा भेद नष्ट व्हावा ॥ ९ ॥

हाचि वर देगा देवा ॥
स्वार्थाचा सूंभ जळावा ॥ १० ॥

हाचि वर देगा देवा ॥
संमतेचा वारा वहावा ॥ ११ ॥

हाचि वर देगा देवा ॥
साऱ्यांनी घाम गाळावा ॥ १२ ॥

हाचि वर देगा देवा ॥
उत्पादनाची वाढ व्हावा ॥ १३ ॥

हाचि वर देगा देवा ॥
आनंदी आनंद घडावा ॥ १४ ॥

हाचि वर देगा देवा ॥
भारत श्रमिकांचा रहावा ॥ १५ ॥

# " उच्चभ्रूंना बदलायाचें "

आम्ही शेतकरी आम्हांला कोठचा सण तेव्हार ॥
विठोबाचें बनलो महार घालीतो जोहार ॥ १ ॥

सत्ता, संपत्ति ज्यांचे हाती बनतात लोकमान्य ॥
कष्टाने कष्टकरी रहातो सदा सर्व सामान्य ॥ २ ॥

ना कष्ट ना त्याग राजकारण ज्यांचा धंदा ॥
बनवा बनवीचे बाजारी ठरतो रुपया बंदा ॥ ३ ॥

सरकारी, निमसरकारी, सहकारी सर्वच संस्था ॥
बेकार, स्वार्थी, लोभी करिती हीन, दीन अवस्था ॥ ४ ॥

कष्टावरती ज्यांची श्रद्धा त्यावरच ठेवा विश्वास ॥
जागृति, हुशारी, समता घ्या हाच श्वासोश्वास ॥ ५ ॥

दिले मतदान तुमचे हाती लोकशाहीचे हत्यार ॥
बदलवा मताने भारत जो श्रमिकांना छळतो फार ॥ ६ ॥

हा भारत कुणाचा ! एक मताने ठरवायाचे ॥
घ्या शपथ ह्या पुढें उच्चभ्रूंना बदलायाचें ॥ ७ ॥

—००—

# " नौकरी "

कष्ट, त्याग, मंत्र गात आम्ही करितो नौकरी ॥
सेवेची खाऊनी भाजी भाकर जगतो खरोखरीं ॥ १ ॥

उत्तम शेती, मध्यम व्यापार कनिष्ट चाकरी ॥
आशा निराशेचे तूप नको ही हक्काची भाकरी ॥ २ ॥

करूं काम मुखी राम आमुचा पिढीजात धंदा ॥
धंदा सोडूनि जो तो नौकरीचे पडतो फंदा ॥ ३ ॥

शाळा, पोलिस, रेव्हिन्यु , पोष्ट, रेल्वे नौकरी पती ॥
मील, फॅक्टरी, गुमास्ता, मुनीम ठरते महासती ॥ ४ ॥

नौकर सनदी सामान्य, नौकरी कायम टेंपररी ॥
वशीला पैसा, हाजी हाजीने बढती मीळते सत्वरी ॥ ५ ॥

उन नको, थंडी नको, दुष्काळाची भीती नाहीं ॥
वाम मार्गे बुद्धि चालतां स्वर्ग हाती ये लवलाही ॥ ६ ॥

सूर्याजी, चाणाक्य जेव्हां बनतात महानंदा ॥
नौकरशाही अशी बनुनी हात जोडीती नंदा ॥ ७ ॥

# " पाऊलें ज्ञानाकडे वळली "

★

आयुर्मान त्रेपन्न मध्यें भर पडली ॥
पानें पिवळी गळाली कोवळी आली ॥ १ ॥

जीवनाची ही वेल मांडवावरी गेली ॥
फुलें बहरली अमृत फळें लागली ॥ २ ॥

संसारगाडी ही पुढे पुढेंच चालली ॥
कुठें जायचें ध्रुव, ध्येय धारणा कळली ॥ ३ ॥

रंगी शींगी जोडी, चंदनाची गाडी थोडी कलली ॥
अंधांची कोल्हे कुई " गाडी पडली रे पडली " ॥ ४ ॥

ज्ञानप्रकाश बघुनी पतंगांनी झडप घातली ॥
मुसळ दिसेना डोळ्यांना कुसळांत पद्मश्री लाभली ॥ ५ ॥

श्रम, त्याग, प्रेम भक्ति कसोटी ठरली ॥
जीवनाचें अंती शांती, समाधानी लाभली ॥ ६ ॥

कवि भोजराजाला जीवनी प्रभूकिमया कळली ॥
तरिच संसारांतील पाऊलें ज्ञानाकडेच वळली ॥ ७ ॥

# " पाहिजे अधिष्ठान प्रभूचे "

आम्ही पाहिले जग झालो धन्य ज्ञानियांचे ज्ञान चक्षुने ॥
भेटला देव आम्हांला झाला आनंद शांतीरुप आंतर दृष्टीने ॥ १ ॥

पृथ्वी कुणाची फॅसिष्टांची लढाई कायम आहे ॥
भारतांमध्यें शिष्टांची फसवणूक चालूच आहे ॥ २ ॥

लागली शर्यत देवदानवांत ध्येय मानबिंदू गांठण्याची ॥
गायी भोवती फिरून गणपतीने संपादली कृपा परमात्म्याची ॥ ३ ॥

श्रमिक गजानन राव कार्तिकेय अहि नकूल वाद कायम आहे ॥
मानवाचे प्रगतिसाठीं चंद्राला रॅकेट धडशा मारीत आहे ॥ ४ ॥

कवि भोजराज वदतात भारती राज्य राहिल श्रमिकांचे ॥
कष्ट, उत्पादन संघटणा चळवळ पाहिजे अधिष्ठान प्रभूचे ॥ ५ ॥

# " प्रियतमा "

मी प्रियकर तूं प्रियतमा कां करिसि ॥
तन्मनी चिंतना ॥ १ ॥

बहरले उद्यान प्रेमालाच ये उधान गाऊं मंजूळगान ॥
दोहोचना ॥ २ ॥

विरहाच्या कंटकराती तूं आरूढता नेत्र पाती ॥
रात्री झोप येईना ॥ ३ ॥

ये शुभांगे ! बैस अंकावर, करांत कर करी हनुवटीवर ॥
नयनी भीडूदे नयना ॥ ४ ॥

# " भारताची अशीच रीत भात "

आम्ही श्रमिकांसाठीं लिहितो ॥
पदवीधर लोक हंसतात ॥
आम्ही म्हणतो असे कां ? ॥
भारताची अशीच रीत भात ॥ १ ॥

आम्ही जनहिताचे बोलतो ॥
सत्ताधारी विरोध करितात ॥
आम्ही म्हणतो असें कां ? ॥
भारताची अशीच रीत भात ॥ २ ॥

आम्ही जन साहित्य निर्मितो ॥
शिष्ट चुकिने चुका काढीतात ॥
आम्ही म्हणतो असें कां ? ॥
भारताची अशीच रीत भात ॥ ३ ॥

टीकेने टीका टोचू पहातो कान ॥
दीडशहाणें धरितात आमुचा कान ॥
आम्ही म्हणतो असें कां ? ॥
भारताची अशीच रीत भात ॥ ४ ॥

जातियवादी श्रमिकास छळतात ॥
श्रमिकांची दिशाभूल स्वार्थ साधतात ॥
आम्हीं म्हणतो असे कां ? ॥
भारताची अशीच रीत भात ॥ ५ ॥

गरिब रात्रंदिवस राबतात ॥
बुद्धिजीवी बंगले उभारतात ॥
आम्ही म्हणतो असे कां ? ॥
भारताची अशीच रीत भात ॥ ६ ॥

सर्वांचे भले आमुची रीत भात ॥
भल्यांचे भले भलत्यांनाच दूधभात ॥
आम्ही म्हणतो असे कां ? ॥
भारताची अशीच रीत भात ॥ ७ ॥

कवि भोजराज विनवीतो श्रमिकांस ॥
भारत आमुचा लावा ध्यास जीवास ॥
उचभ्रूंचा भारत पाडिली रितभात ॥
करा संघटना, एकी भारत घ्या ताब्यांत ॥ ८ ॥

## " वैरांगीनी "

ये बिलग कामिनीं, सौंदर्यखनी, शांत मनी ॥
निवांत काननी ॥

प्राशूदे अधर सुधा मधूर हृदयांतील गे !
कमलनयनी ॥

विरह संपला, चंद्र उगवला पाझरे चंद्रकांतमणी
प्रित स्वप्नी ॥

केला विचका, फुटले कपाळ वैरांगीनी झोपेने
उगीच भांडण उकरूनी ॥

## " साम्यवादी अय्या "

卐

" आम्ही साम्यवादी अय्या "
आहोत शेतकरी भय्या ॥
जीवनी कोंड्याचा मांडा ॥
उचभ्रूंना घालूं कोलदांडा ॥ १ ॥

करूं काम संतमार्गें जाऊं ॥
वाढपी वाढून सर्वां देऊं ॥
कविजन उरलेले ते खाऊं ॥
शेतकऱ्यांचेच गुण गाऊं ॥ २ ॥

उन, पाऊस, थंडी साहूं ॥
आळस, स्वार्थ निंदेचा बाऊ ॥
घर भेदियांना धक्का देऊं ॥
भोजराज प्रार्थितो जी भाऊ ॥ ३ ॥

## " प्रेम "

आम्ही प्रेम केले प्रेयसीवर ॥
प्रेमी म्हणू लागलें वाहऽवा छान ॥ १ ॥

प्रेम म्हणजे भोग नव्हे, बींग फुटतांच ॥
प्रेम वीर नींदू लागले कवि भोजराज नादान ॥ २ ॥

# " जा जा आपुल्या घरीं "

जा जा आपुल्या घरीं ॥
आम्हांला करूं द्या चाकरी ॥ १ ॥

मानवतेचे आम्ही पुजारी ॥
रावांची हजेरी काय जरुरी ॥ २ ॥

ना चहापान देणार ॥
ना आम्ही कुणाचे खाणार ॥ ३ ॥

आम्ही प्रेमी, पंढरीचे वारकरी ॥
भोगी काय करणार बरोबरी ॥ ४ ॥

आम्ही कधींच नव्हतो पीत ॥
आई बाबांची प्रीत घोट घेत ॥ ५ ॥

सत्ता संपत्तीची दुष्टांना नीशा ॥
जनता, संग्रह कीर्ति दाही दिशा ॥ ६ ॥

कधीं बाळगतो शब्द दवा दारु ॥
सुखी संसाराचे हांकतो तारु ॥ ७ ॥

दिसतांच आम्ही रमलेले ॥
शिष्ट वदणार आम्हां झिंगलेले ॥ ८ ॥

त्याग समता एकी करणार ॥
श्रीमंताचे पोटांत गोळा उठणार ॥ ९ ॥

कवि भोजराज गीत गाणार ॥
उच्चभ्रू सत्तेला लत्ता मारणार ॥१०॥

—००—

## " धनांधांना येतो आजार "

कोकीळ कंठ गोड गळा सुप्रभाति गायकाने गाता भूपाळी ॥
असुरांचे कानी पडतांच सूर दिसते अढी भेदी यांचे कपाळी ॥ १ ॥

मंगल सकाळ गंगालहर आमुचें गळ्यांत घुमतो मालकंस ॥
लाखो गवळी गवळणी नाचतात थरथर कांपतो मथुरेचा कंस ॥ २ ॥

प्रेम वनांत भक्ति मनांत अद्वैताचा सूर बहरतो राग वसंत ॥
भोगी हवाबंदवाले आमुचे गायन कसे करतील पसंत ॥ ३ ॥

श्रमिक रात्रीं गाता मेघ, दीप राग पडतो पाऊस चंद्रप्रकाश ॥
सट्टेबाज, लक्ष्मी राजपुत्रांना गायन ऐकण्यास कुठचा अवकाश ॥ ४ ॥

असुरांच्या राज्यात गाते लता, गातो रफी राग रुपये हजार ॥
कवि भोजराज करिताच प्रभूचे गायन धनांधांना येतो आजार ॥ ५ ॥

# "देव खिलाडी खिलाडी"

★

देव खिलाडी खिलाडी ॥
दिसतो अजब गारोडी ॥ १ ॥

देव घेतो भाव भक्ति ॥
देतो शक्ति आणि मुक्ति ॥ २ ॥

एक चमचा दुधाचा भूकेला ॥
सारे वाटीतो दूध सकलां ॥ ३ ॥

पुष्प फळाची आस मोठी ॥
कोटी तरूं निर्मितो जगत्‌जेठी ॥ ४ ॥

देवच नाहीं निसर्ग सृष्टी ॥
विद्या गर्वाची भाषा पुष्टि ॥ ५ ॥

लोभी स्वार्थी बनतात श्रेष्ठी ॥
भारती त्यांचीच चंपा षष्ठी ॥ ६ ॥

नका विसरु देव कृपाळू ॥
जग पोषितो मोठा दयाळू ॥ ७ ॥

भोजराजावर कृपेची वृष्टी ॥
देवच डोळा कविता दृष्टी ॥ ८ ॥

# "केशवसुत हळहळले"

शेतकऱ्यांनो काय स्पर्शिता कविता भोगिता कविता ॥
लागेल तुम्हां पाप ती उच्चभ्रूंची आहे दुहिता ॥
गायीपासुनी दूध पिते वासरु तोडीता हंबरलें ॥
कवि कसाई असा बघुनि केशवसुत हळहळले ॥ १ ॥

कविता म्हणजे हवाबंद बंगला सोफासेट ॥
चिंतामणी पडतां हातांत सहज होते प्रेमभेट ॥
कविने कवितेस जेव्हां जबरीने भोगीले ॥
भोगी वृत्तिचा कवि बघुनी केशवसुत हळहळले ॥ २ ॥

कविता असते बुद्धिजीवींची आतषबाजी ॥
फुलबाज्या चंद्रज्योति रावांची चालबाजी ॥
शहरवासी कविंनीच पेरलेले कूपमंडुकतेने उगलेले ॥
मंडूक कविंचा आवाज ऐकुनी केशवसुत हळहळले ॥ ३ ॥

पद्यांत दिसते उच्चवर्णिय नीति उच्च जाहिरातबाजी ॥
पोलादी चौकटीतील संघटणेची येते प्रचिती ॥
श्रमिक शंबुकांना वशिष्टांनी वाळीत टाकले ॥
आधुनिक कविंची कारवाई बघुनि केशवसुत हळहळले ॥ ४ ॥

कविता म्हणजे गंमतबाजी मेथीची भाजी ॥
उच्चभ्रूंचे परसुमध्यें सदा मीळते ताजी ताजी ॥
कवि, संपादक, टीकाकार दिसतात झिंगलेले ॥
किंचित कविंचा सोमरस पिऊनि केशवसुत हळहळले ॥ ५ ॥

## " उच्चभ्रू राक्षस "

उच्चभ्रू राक्षस कष्ट करी देवता एकत्र नांदती भारतात ॥
देवता करितात हाय उपस उच्चभ्रू श्रीखंडपुरी चापतात ॥ १ ॥

ध्येय धारणा ज्यांची ईस्टेट कमवावी लक्ष, दशलक्ष ॥
समजावे भारती पडला दुष्काळ राक्षसांनी निर्मिले दुर्भिक्ष ॥ २ ॥

साम्यवाद, लोकशाहि उत्पादन कोटीशब्द प्रचार हेच लक्ष ॥
भूरळ, भुलावणी, संचित, संस्कृति भाषेने गाठतात मोक्ष ॥ ३ ॥

मूठभर लाखोंची निवडणूक विजयी होतात भेदाभेद बहाद्दर ॥
भारतमाते किति दिवस सोसणार राक्षसांचाच भार ॥ ४ ॥

कवि भोजराज विनवितो घरांघरांतून घालवा अज्ञान ॥
करा अभ्यास श्रमिक राज्याचा कष्टानंतर तुम्हां येवढेच काम ॥ ५ ॥

## " गायन "

गायन म्हणतांच श्रीखंड पुरी चापून जेवायचे ॥
योगा योग मुखेच कविच्या आहे मुखानेच खायचे ॥ १ ॥

देव देवळांत चित्त खेटरांत विसरा ! देहभान व्हायचे ॥
विठोबा चरणी तन मन धन विठोबाच बनायचे ॥ २ ॥

रसिक श्रोता खादाड हवा गाण्याने केले वेडे पिसे ॥
ब्रह्माघरी नेतो गायक रसिक हृदयि ब्रह्मनाद घुमतसे ॥ ३ ॥

कवि भोजराज गायक एकच छान योग दिसतसे ॥
ब्रह्मानंदी टाळी लागतां नाद ब्रह्म होतसे ॥ ४ ॥

# " ज्ञानमय ज्योर्तिप्रकाश "

ब्रह्म जाणे तो ब्राह्मण व्याख्या साधी, सरळ, सोपी असे ॥
ब्राह्मणांचा ब्रह्मघोटाळा भारती ब्राह्मणच घोटाळतांना दिसतसे ॥ १ ॥

नाऱ्याचीं भगवी झोळी नुऱ्याचा फकिरीबाणा पिऱ्याची बुद्ध टोपी ॥
जातियतेचे फिरते रॅकेट भारती श्रमिक चक्रांत पाडतात कोटी कोटी ॥ २ ॥

निधर्मी राज्यांत धर्मांधाचे मंडळ सकाळचा मंत्री सायंकाळी गडगडतो ॥
दिल्लीचा ब्राह्मण कृष्ण गवळणी भोवती गरबाडान्स करितो ॥ ३ ॥

कारखानदार, जमीनदार, श्रीमंत, व्यापारी, वकील, आचार्य ॥
प्राचार्य, महर्षि, शास्त्री, पंडित जात एकच समजतात आर्य ॥ ४ ॥

विषमता, भेदाभेद, अशांतता, फोडा, झोडा, जोडा येव्हढेच कार्य ॥
कष्ट करणारा अडाणी, पापी, दुर्दैवी जाहीरात बदतात अनार्य ॥ ५ ॥

भारत हा शिष्टांचा व्यासपीठ रेडिओ द्वारा चालतो प्रचार ॥
श्रमिकांना पाजतात दारु संघटना एकजूट एक विचार ॥ ६ ॥

कवि भोजराज फोडतात टाहो; श्रमिकासाठीच घेतात श्वासोश्वास ॥
लार्डीचे वीज केंद्र काय कामाचे घरोघरी पेटवा दिवा ज्ञानमय ज्योर्तिप्रकाश ॥ ७ ॥

# " संत तुकाराम "

भारतीय मंबाजी वदतात पंत ॥
टोपलीभर कवि गातात संत ॥
बोला ! बोला ! पंढरपूर काशी ॥
तुका गेला ! गेला ! वैकुंठासी ॥ १ ॥

उठ मर्दा ! रडून कां वेळ घालवीसी ॥
जों एकदां गेला तो नच परतलासी ॥
जो नच मेला त्या करितां कां रडसी ॥
उच्चवर्णियांची थाप प्रचार व मखलासी ॥ २ ॥

बिहारला दुष्काळ उडाली तारांबळ ॥
कोकण किनाऱ्याला आले वादळ ॥
कोयनेचा भूकंप पुढाऱ्यांचा गोंधळ ॥
उच्चभ्रूंचे पाप श्रमिकांना ताप जाणा मंडळ ॥ ३ ॥

प्रयत्ने वाळूचें आहे तेल काढायचे ॥
श्रम, उत्पादन वाढ विकेंद्रिय करण्याचे ॥
राज्य नसे भोजाचे गंगा तेल्याचे ॥
उच्चभ्रू मूर्खांचे नादी न लागायचे ॥ ४ ॥

खूप धन धान्य आहे पिकवायचें ॥
भारती श्रमिकांनीच राज्य करावयाचें ॥
दिल्ली, मुंबईला, काशी, पंढरपूर बनवायचें ॥
कोटींची नांव तारण्यासाठी उच्चभ्रूंनाच बुडवायचें ॥ ५ ॥

कवि भोजराज सत्य वदतात ॥
श्रमिकासाठीच प्रचार करितात ॥
तुकारामाचें दास जनतेला प्रश्न करितात ॥
जनतेला सोडून तुकाराम स्वर्गी कां जातात ॥ ६ ॥

तुका नच गेला वैकुंठासी ॥
परि श्रमिक त्याला विसरलासी ॥
बघतांना उच्चभ्रूंची लावीता चाळीशी ॥
त्यामुळेच अधोगती दारिद्य आले गळ्यासी ॥ ७ ॥

कसला दुष्काळ, कोठचा भूकंप अज्ञान घराशी ॥
विभूति पूजा अंधश्रद्धा काय कामाची ॥
कष्ट करा ! कष्ट करा ! वेळ मंत्र जपायची ॥
ज्याचे त्याचे घर ज्याने त्याने आहे सजवायची ॥ ८ ॥

## " दर्पण "

आम्ही काय केलें ! केलें नाहीं ॥
करावयाचें राहीले ॥ १ ॥

करून करून भागले व शेवटीं ॥
देवपूजेला लागले ॥ २ ॥

आमुचे जवळ नव्हती जमा खर्चसारे ॥
देवार्पण ॥ ३ ॥

लुटला जीवनाचा आनंद ठेविताच ॥
स्वच्छ दर्पण ॥ ४ ॥

# " लग्नाचा अजब सोहळा "

काय वर्णाव्या सत्ता संपत्तिच्या कृष्णलिला ॥
चला चला लग्नाला बघा अजब सोहळा ॥ १ ॥

घोड नोवरदेव त्याचे तोंडांत नाहीं दात ॥
शोभते सोन्याची बत्तीशी तरुण तरुणांत ॥ २ ॥

महा बेरड पुरुष प्रसिद्ध नगर पिता ॥
पत्नि मरतांच विधूर दुष्किर्ती हीच दुहिता ॥ ३ ॥

सावकार कारखानदार जमींदार मोठा ॥
कष्टकऱ्यांना होता पिळित गांव बनवीले गोठा ॥ ४ ॥

असा स्वार्थी नगरपिता बनला होता नोवरदेव ॥
जनता साधी भोळी न समजे त्याचा डाव ॥ ५ ॥

आज पंचवीस वर्षापासून तो होता नगरपिता ॥
जनतेला गुलामगिरीचें पाणी पाजीत होता ॥ ६ ॥

एक काळ होता चौधरी होते काँगरेसी ॥
पाटील होते सावकार दास अंगरेजी ॥ ७ ॥

दुर्दैव भारताचें सापाला भेटीतो साप ॥
नाही वाली गरिबाचा शेतकरीच मायबाप ॥ ८ ॥

उन्हाळ्यात जळते गांव कानांवर हात ठेवितो ॥
पाणी ! पाणी ! करीत नागरीक तळमळतो ॥ ९ ॥

पाटलाचा शंकरराव चौधऱ्याची लेक काशी ॥
पार्वती आली घराशी लग्न लागते दाराशी ॥ १० ॥

हंड्या झुंबरांचा मांडव दिला नगर पालिकेत ॥
लाडू जिलबीचे जेवण शब्द बोलाचाच भात ॥ ११ ॥
नोवरदेव विष्णू नोवरी लक्ष्मी मध्यें अंतरपाट ॥
वाजतो सनई चौघडा गीत गातीं भाट ॥ १२ ॥
नोवरदेव नोवरी मंडपांत तेथें वऱ्हाडी सरकारी ॥
मंगलाष्टके गातो भटजी शेतकरी कैवारी ॥ १३ ॥
श्रेष्ठीचा आशीर्वाद वर मीठी मारीतो वधूला ॥
बाप करितो कन्यादान जनता बघते बापाला ॥ १४ ॥
नोवरा कुरूप नोवरी सुंदर न शोभे त्याला ॥
वधू रडते धाय धाय म्हणते बापाने घात केला ॥ १५ ॥
भटजी मुंबईचा होता हॅली केप्टरने आलेला ॥
आश्चर्याने बघते जनता जादूगार भटजीला ॥ १६ ॥
खाकी पॅन्ट सोटा पट्टा पोलिस दिमतीला ॥
सत्ता संपत्तीची नशा वर होता झिंगलेला ॥ १७ ॥
बहिरे मुक्यांचा बाजार अज्ञान हेच घर ॥
श्रमिकांच्या शिव्याशाप शाल जोडीतून अहेर ॥ १८ ॥
नगरपालिका गरिबांची तीत श्रीमंताचे चित्र ॥
अशी कशी हो लोकशाही सारे चित्र विचित्र ॥ १९ ॥
गोरज मुहूर्ताला एकदां वाजले लग्नाचे सूप ॥
वधू वर मधुचंद्रासाठी गेले काश्मिरात ॥ २० ॥
झाला तपास चौकशी चोरी नगरपालिकेत ॥
एक लक्ष रुपये लग्न खर्च जनता पैशात ॥ २१ ॥
कवि भोजराज प्रार्थितो श्रमिक जनतेस ॥
घ्या सत्ता हातांत द्या धक्का श्रीमंतास ॥ २२ ॥

# " मनी वसे ते स्वप्नी दिसे "

★

मनी वसे ते स्वप्नी दिसे अज्ञान हेंच मुळाशी असे ॥
अज्ञानाचा फुटता फुगा भारतमातेची सुटका होतसे ॥ १ ॥

आम्ही भारताचे सुपुत्र भूगोल, इतिहासात नाव नसे ॥
विभूति पूजेचा पगडा स्वत्वाचा विसर पाडला जात असे ॥ २ ॥

आम्ही कष्ट करितो कष्टाचेच खातोपितों जीवन जगतो ॥
श्रमिकांना पोकळ उपदेश श्रमिकांचा छळ होतांना दिसतो ॥ ३ ॥

सुख पहाता जवापाडे नशीबी दुःख पर्वता येव्हढे ॥
दुःखाचे मूळ उच्चभ्रू भटजी वदतात "पुण्यापेक्षां पाप मोठे" ॥ ४ ॥

नच आशा आकांक्षा श्रमिक पर धार्जीणे जीवन जगतसे ॥
उच्चभ्रूंची मूलथाप ग्रंथ वाचतांना लक्षात येत नसे ॥ ५ ॥

शेतकरी, कामकरी देशाचे रहातील कारभारी पुढाऱ्यांनी बनविले ॥
राक्षसांनाच द्या मते त्याग करा येव्हढेच श्रमिकांना शिकविले ॥ ६ ॥

लोकशाही म्हणजे काय स्वार्थीयांचे तोलालाच मोल असे ॥
आम्ही श्रमिक पडतो चक्रांत जो तो श्रेष्ठींचे नांव घेतसे ॥ ७ ॥

कवि भोजराज प्रार्थितात करा अभ्यास मनी सदा जागृति ठेवा ॥
भारत हा श्रमिकांचाच स्वप्नातही विसर पडू न द्यावा ॥ ८ ॥

# " जन्मा येते श्रमिकांची कविता "

卐

श्रमिकांची कविता उच्चभ्रूंना बोचली मर्मी टोचली ॥
साऱ्यांना सोसली जनहिताचेच बोलली ॥ १ ॥

निसर्गमय कविता कृषिजनांनी शेतातच लिहीली ॥
पाण्यांत डुंबली मातीत लोळली जीवनाची बाग फुलली ॥ २ ॥

कष्टावरती श्रद्धा ज्यांना कळतो आचार, विचार ॥
त्यांचेच प्रगतिसाठीं नीघाला झुंजार कविता प्रचार ॥ ३ ॥

भारतांत श्रीमंतांचें यावं ऽ हेंच गांव राव हेंच नांव ॥
श्रमिकासाठीं वनवास जावं ऽ हेंच गांव रंक हेंच नांव ॥ ४ ॥

मेव्हणे टीकाकार वदतात कांहो ! भोजराज वितां ॥
खातो, पितो, संभोगतो शब्द तरीच जन्मा येते कविता ॥ ५ ॥

भोजराजाची कविता कष्टानें गुंफली, प्रेमाने रंगली ॥
भक्तिने मोहिली सारी जनता आत्मानंदी गुंगली ॥ ६ ॥

# " गुलाबाचें फूल "

●

आम्ही हातांत ठेवितो सदा गुलाबाची फांदी ॥
आणि काढितो गुदगुल्या गुलाब फुलाने ॥

धनलोभी, ऐतखाऊ, स्वार्थी, शिष्ट ओरडतात ॥
भोजराजाने आम्हांला बोचकारिले गुलाब काट्याने ॥

# " कृष्णार्पण "

आम्ही जेथे जातो व रहातो तेथे करितो जग निर्माण ॥
पैसा अडका सत्ता संपत्ती, सारेच करितो कृष्णार्पण ॥ १ ॥

आम्ही भावाचे भुकेले प्रेम, भक्ति जीवन सार ॥
भोगू सौख्य आनंद कैसे म्हणावें देवाचे जग हे असार ॥ २ ॥

आम्ही पाहिले जग शोधुनही न मिळाले शत्रु आणि मित्र ॥
जात, धर्म, पंथ, पक्ष सारे त्यजीले बनलो अंधाराचे मित्र ॥ ३ ॥

आम्ही, अडाणी, गरीब ठरलो उच्चभ्रू मते किडा व मुंगी ॥
मेणबत्ती उदबत्ती चंदनाचा देह गुणसंपत्तीच आंगीं ॥ ४ ॥

आम्हांला कशाची कमतरता कष्टाची बनविली नाव ॥
उत्पादन हेंच आमुचें गांव देव घरांत ठरतो रावांचे राव ॥ ५ ॥

कष्टावरती आमुची श्रद्धा त्याग सेवा हाच बडेजाव ॥
शिष्ट करोत उपदेश शिष्टांना आम्हांला करावयाचे काय ॥ ६ ॥

कवि भोजराज वदतात करा असहकार उच्चवर्णिय उच्चभ्रूंशीं ॥
करा एकी, संघटणा रहा एकात्म भारतमातेशीं ॥ ७ ॥

# " जीवनसार "

★

आम्ही गरिबीने झालो सर्द शस्त्रक्रियेने ॥
बनलो खच्ची ॥
आतां कसली कच्ची बच्ची मूर्खांनी केली पच्ची ॥
तरी वाणी बोलावी सच्ची ॥ ॥ १ ॥

आम्ही आहोत वीर, संयमी, कर्मयोगी उधळपट्टीशी ॥
काय संबंध ॥
काटकसर देह आतमा कष्टानेच लुटला ॥
जीवनाचा आनंद ॥ ॥ २ ॥

कवि भोजराज प्रार्थितात श्रमिकास ॥
भोगा सौख्य जीवन सार ॥
कष्ट त्यागाने करा संसार, चैनबाजी ॥
सारे असार ॥ ॥ ३ ॥

# " असूर "

ऐका जनहो ! शेतकऱ्यांनो तसेच श्रमिक, मजूर ॥
श्रीमंत, सावकार, व्यापार शाहीत कोण ठरतात हुजूर ॥
सत्तेचा धूर मत्तेचा पूर राजयंत्रणेंत महशूर ॥
श्रमिकांचे रक्त मांस खातात पितात त्यास म्हणावे असूर ॥

# " शिष्टांचा महाकवि "

वरती गोरा अंतरी काळा गोड वाणी ॥
फसवी भाषा शब्दांचीच पाया भरणी ॥ १ ॥

शिष्ट वासनेचा आहे भूकेला ॥
कवि बकध्यान बंगला किनाऱ्याला ॥ २ ॥

शिष्टांचा वाद कले करितां कला ॥
सफाईनें श्रमिकांचा कांपती गळा ॥ ३ ॥

शिष्ट वदतात जीवना करितां कला ॥
सर्वांची भूल वाद मूलखा वेगळा ॥ ४ ॥

जन्म ह्यांचा शहरांत सदाशीव पेठेला ॥
कधीं कधीं मैफल रंगते दादर विभागाला ॥ ५ ॥

ना स्थान सामान्य जना शिष्ट कवि भला ॥
कवि राज्य शिष्टांचें भेदा भेद ठरलेला ॥ ६ ॥

शिष्ट पिपांत पडला मेला उंदीर ॥
संगमरवरी मूर्ति वरती मंदीर ॥ ७ ॥

रुढीप्रिय भटजी ठेवीला पुजारी ॥
उच्चभ्रू कवि चलाख प्रसिद्धी भारी ॥ ८ ॥

धंदाच दिनरात देवाचा गातो महिमा ॥
भोळ्या भक्तांचा करितो खिसा रिकामा ॥ ९ ॥

गोंजारून श्रमिकांना जवळ घेतो ॥
मी तुमचा गुरुंचा गुरु गीत गातो ॥ १० ॥

सारे ढोंगी भारती करितात गायन ॥
बहिरे, मुके, अंधांची बांधती दावन ॥ ११ ॥

विषय विभूति पूजा पडद्या आड लपतो ॥
उच्चभ्रूंची संघटणा मजबूत करितो ॥ १२ ॥

रंगभूमि रंगारी बुवा तेथे जमती बाया ॥
धनलोभी मायेचा हात पडते उघडी काया ॥ १३ ॥

धूर्तांनी वारियोषितेला दिला प्रेम हाट ॥
मधूचंद्राची रात भोगता झाली पहाट ॥ १४ ॥

करूं काम हा प्रश्नच तेथे नसतो ॥
राहूं द्या सत्ता विषय हाच असतो ॥ १५ ॥

कवि भोजराज श्रमिकांचेंच गीत गातो ॥
भुकेलेल्यांच्या करितां पुकार, टाहो, फोडितो ॥ १६ ॥

## " स्वप्नमंजीरी "

दुधअी पौर्णिमा, शीतल चांदणे, कर्पूर गंधा ॥
लाभावी ॥ १ ॥

घनदाट काननी, मस्त जवानी संगीतानें ॥
साथ करावी ॥ २ ॥

देहाची आसक्ति, आत्म्याची तृप्ति मध्यें ॥
नाचते सौंदर्यखनी ॥ ३ ॥

सुगंधी राग, धूंद रागीणी, मधूर गाणी ॥
सरता सरली ही रजनी ॥ ४ ॥

# " मागची आठवण होता "

मागची आठवण होता आम्हांला येतसे रडे ॥
खरेंच कां ! दत्त म्हणून स्वप्न पडते कोडे ॥ १ ॥

भारती अमृताचा पाऊस नीघत होता धूर सोन्याचा ॥
दुधा दह्याची नदी झुळ झुळ झरा वहात होता तुपाचा ॥ २ ॥

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र सर्वांची भाषा संस्कृत होती ॥
वशिष्ट मुनि राजांचे गुरु राजपुत्रांचीच शीकवणी होती ॥ ३ ॥

वेदांसाठीं शंबूक विद्येसाठी एकलव्य निष्ठेने तिष्ठत होता ॥
गुरुदक्षणा म्हणून हिंसेचा सूर अहिंसेतून मधूर नीघत होता ॥ ४ ॥

भूतांपेक्षां विभूति श्रेष्ठ प्रथम राक्षस देवराजांत लढाई होती ॥
सत्य मेव जयते, प्रेम, अहिंसा, भक्तिची बढाई शेवटी होती ॥ ५ ॥

सत्य त्याग समतेचा नद्यांना पूर वसंत बहरत होता ॥
कधीं मधीं दुष्काळ विश्वामित्र श्वानहड्डी चघळत होता ॥ ६ ॥

राव रंक योग भोग भेदा भेद अस्तित्वांत नव्हता ॥
शठ, गुंड, मवाली, चोर धुंडावा लागत होता ॥ ७ ॥

कुत्र्यांना झूल, नागांना दूध, कोल्हे वेदमंत्र गात होते ॥
शुद्रांचें सावलीने वीटाळलेला देह गंगास्नान करित होते ॥ ८ ॥

पुण्य वर देवकृपा पुराणांत ब्राह्मण क्षत्रियांनाच मोक्ष होता ॥
स्वर्गापेक्षां भारत सुखी ब्राह्मण हिताय देव अवतार घेत होता ॥ ९ ॥

राजदंड, देहदंड, दंडच शब्द राजकोषातच नव्हता ॥
भूतकाळापेक्षां स्वर्गमय सुखासाठीं राजा त्याग करीत होता ॥ १० ॥

कल्पतरु कामधेनू, चिंतामणी भारती अमृत वर्षाव होता ॥
आजार, अपघात, दुख, मरण प्रत्येक भारतिय अमर होता ॥ ११ ॥

ऋषिंचा शाप, मुनींचा ताप गरिब्रांना बाधत नव्हता ॥
शापमुक्त राजाराणीचा ताम्रपट पुरावा जीवंत होता ॥ १२ ॥

आश्चर्य, जप, मंत्र, जादू, चमत्काराला नमस्कार होता ॥
शक्ति पेक्षां, बुद्धि श्रेष्ठ, युक्ति पेक्षां मुक्ति वरीष्ठ जो तो मुक्त होता ॥ १३ ॥

वाल्मिक, व्यास, कालीदास, भवभूति देवांसाठींच होते ॥
ब्राह्मण, राजाच देवता बाकी सर्व गंगेत वहात होते ॥ १४ ॥

चित्रकला, वाद्य, गायक, नृत्य बारा विद्या चौषष्ट कला होत्या ॥
राजदरबारांतच धांगडधिंगा गरिबांचे घरांत शुकशुकाट होता ॥ १५ ॥

हनुमानोड्डाण, लंकादहन, युद्धकांड, वीररसाने न्हाला होता ॥
जीवा शीवाची गांठ भेट शांतीरसच प्रधान होता ॥ १६ ॥

कष्टाचा प्रश्नच नव्हता दूध, तूप, भात होमासाठी अग्नि पेटत होता ॥
जठराग्नी शमविण्यासाठीं यजमान अतिथीची वाट बघत होता ॥ १७ ॥

नप्तुर्लभे अतिवोत्कंठा व्यासांनी महाभारत लिहीला होता ॥
अणुभूमिकणासाठीं कोटींचा देह मातीत मीसळला होता ॥ १८ ॥

सिता सुंदरी, द्रौपदी सती व्यक्ति करितां युद्धप्रसंग होता ॥
मानवांना स्वर्गप्राप्तीं कविंनी राजाचें देहांत पेंढा भरला होता॥ १९ ॥

युद्धाने मीळतो स्वर्ग अथवा महितल गीता अमृत स्रवली ॥
चंगी, भंगी, राजे, रावा साठीं कां तीं विषमय ठरली ॥ २० ॥

कवि भोजराज कथितात श्रमिकांस नका रडू पुसा नयन करा कोरडे ॥
मागच्याच ठेंच पुढचा शहाणा श्रमिक चालला पुढे पुढे ॥ २१ ॥

# " आधुनिक कवि मंडळ "

卐

उच्चभ्रूंचेच राज्य आहे ॥
धन सत्ताच पाया आहे ॥ १ ॥

धनिकासाठीं हिरवे रान आहे ॥
श्रमिकासाठीं श्रमदान आहे ॥ २ ॥

राजकारण हाच धंदा आहे ॥
देश भक्तिचा मान शान आहे ॥ ३ ॥

श्रीमंता करिता सत्ता आहे ॥
गरिबा करितां भत्ता आहे ॥ ४ ॥

पैशाकडे पैसा जात आहे ॥
स्वस्ताई भस्मासूर जाळीत आहे ॥ ५ ॥

सत्य सांगणें ताप आहे ॥
सत्य चालणें पाप आहे ॥ ६ ॥

चारसे वीसची दुनिया आहे ॥
समाज कंटकांनी घेरली आहे ॥ ७ ॥

कष्ट करणारा उपाशी आहे ॥
अज्ञान हेंच मुळाशी आहे ॥ ८ ॥

उच्चभ्रूंनाच मान आहे ॥
अडाणी जनता भोळी आहे ॥ ९ ॥

सरस्वतीचा प्रांत आहे ॥
भेदा भेद पाडला आहे ॥ १० ॥

आधुनिक कवि मंडळ आहे ॥
चौकट पोलादी बनली आहे ॥ ११ ॥

जेथे उच्च भ्रूंचे गायन आहे ॥
तेथे श्रमिकांना मनाई आहे ॥ १२ ॥

श्रमिकांचा कवि गातो आहे ॥
उच्चभ्रू दात ओठ खात आहे ॥ १३ ॥

करा मतदान तुमचे हाती आहे ॥
भारती श्रमिक राज्य येणार आहे ॥ १४ ॥

## " बोला सावधान "

संत हेचि देव त्यांनी निर्मिले वीज केंद्र ॥
देवांचा राजा कष्टकरी राक्षसांचा आहे इंद्र ॥ १ ॥

आम्ही कृतिचे रॅकेट सोडले संघटणेने देव पावला ॥
श्रमिकांनी गांठला ध्रुव उच्चभ्रू वदतात उलकापात झाला ॥ २ ॥

आम्ही बारा तास राबलो आणि बैल म्हटले गेलो ॥
उच्चभ्रूंना दिलेले मतांनी किडा, मुंगी, क्षुद्र ठरलो ॥ ३ ॥

आम्ही करितो कष्ट काढितो उत्पादन, वाढवीतो भारताची शान ॥
जडवाद्यांचे राज्यांत फक्त मिळतो भट, भाटांनाच मान ॥ ४ ॥

कवि भोजराज प्रार्थितात व्हा जागे ! ठेवा अवधान ॥
जात्यांधांनी तुम्हां फसविलें उच्चभ्रूंनी लुबाडले बोला सावधान ॥ ५ ॥

# " हा भारत असे कुणाचा ? "

★

हा भारत असे कुणाचा ? ॥
हा भारत नसे कुणाचा ॥
प्रश्न जन्म मरणाचा ॥
श्रमिकांनीच सोडवायाचा ॥ १ ॥

सत्ताधारी ह्यांचे मुखातुनी ॥
नीघते सदा वाचा ॥
होता भारत काँग्रेसचा ॥
आहे काँग्रेसचा राहील काँग्रेसचा ॥ २ ॥

हे बघा हल चक्र गुलाल ॥
उधळीत प्रकाश सूर्याचा ॥
कष्टकऱ्यांचें हितासाठींच ॥
बोल निघे सं. सो. पाचा ॥ ३ ॥

पौर्णिमेचा चंद्र उगवला ॥
झोपडीत पसरे प्रकाश ॥
प्र. सो. पाचा आवाज घुमतो ॥
दु म दु म ते आकाश ॥ ४ ॥

हातोडा, कोयता दर्शवितो ॥
आम्ही धरतीचे लाल ॥
देऊं झुंज भांडवलदारांशी ॥
भारत करूं लाल लाल ॥ ५ ॥

गोहमारी माता देश धरमका नाता ॥
घोषणेचा अर्थ एकच सारखा ॥
हिंदू महासभा जनसंघ ॥
जानव्याच्या तारा तीनच ॥ ६ ॥

लाल निशाण, शे. का. संसोपा ॥
नव बुद्धांची बनली समीति ॥
झटती देश, हितासाठीच ॥
जातीचा न विचार करिती ॥ ७ ॥

आचार्य, शास्त्री, पंडित ॥
रँग्लर, ह. भ. प. कुलगुरू ॥
महर्षि, महोपाध्याय, वेदोनारायण ॥
किती तरी गणती करूं ? ॥ ८ ॥

जय प्रकाश, लोहिया, देसाई ॥
लाला, कृपलानी, वाजपेयी ॥
पटनाईक, कपूर, चौधरी ॥
बोस, मुकर्जी सारेच विचारी ॥ ९ ॥

नॉडर, चॅरिअर, सुब्रह्मण्यम् ॥
मेनन, रंगा, कृष्णमचॅरि, रेड्डि ॥
चमकत असेल तर डोळ्यावरती ॥
अंधश्रद्धेची ठेवा पट्टी ॥ १० ॥

अणे, जोशी, लिमये, दंडवते ॥
गाडगीळ, गोरे, खेर खरे ॥
श्रमिकांचे कैवारी सारे ॥
ठेवा विश्वास दिवस येतील बरें ? ॥ ११ ॥

डॉक्टर, वकील; बॅरिष्टर ॥
पहिला वर्ग पास मातबर ॥
कधींच नाही श्रमिका बाबत ॥
चूक करिती थोडी फार ॥ १२ ॥

कथा, कादंबरी, नाटक ॥
ग्रंथनिर्मिती उचभ्रू हाती ॥
वर्तमान पत्रांत चालतो प्रचार ॥
जाऊ द्या उच्चभ्रू घोडे पुढती ॥ १३ ॥

भारतीय सारे एकच ॥
घोषणा गोड मजेची ॥
एक लाखाची वाजे बांसरी ॥
उच्चभ्रू भाषिक संघटणेची ॥ १४ ॥

आम्ही शहाजोग बाकी चोर ॥
पत्रांतून आवाज काढायचा ॥
हवालदील झालेला श्रमिक वर्ग ॥
गोंजारून पिंजऱ्यांत कोंडायचा ॥ ॥ १५ ॥

आम्ही ज्ञानी आम्हीच गुरु ॥
आम्हीच शीकवीले श्रमिकांना ॥
नम्र प्रामाणिक एकलव्य ॥
हात जोडितो द्रोणाचार्यांना ॥ १६ ॥

हंसत हंसत बोलले आचार्य ॥
"नको घाबरू नाहीं अंगुठा मागत ॥
उभा आहे मी पहाड पट्टीला ॥
फक्त पाहिजे तुमचे मत ॥ १७ ॥

" धांव ! लक्ष्मणा धांव !" ॥
सिता भयंकर घाबरली ॥
मारीच म्हणजेच राम ॥
दिराला खूप टाकून बोलली ॥ १८ ॥

मायावी रावण चक्रांत पाडले ॥
राम, लक्ष्मण, आणि सिता ॥
नाही समजू दिले श्रमिकांना ॥
कोण त्राता कोण आपुला भ्राता ॥ १९ ॥

"पाक कोल्हा, चिनी लांडगा ॥
आला ! घाला बंदुकीच्या गोळ्या ॥
श्रमिकांचे तव्यावरती ॥
तोंवर भाजीतो पुरणपोळ्या ॥ २० ॥

उच्चवर्णीय बुवा उच्चभ्रू बाया ॥
श्रमिकांचे लक्ष्मीचे हात हातांत ॥
पहायचा झाला तर खुल्या ॥
जावें लागते गंधर्व नाट्यगृहात ॥ २१ ॥

बघा नवल जादू, चमत्कार ॥
हिरण्यकशिपू भजतो नारायण ॥
प्रचारासाठींच कविता रचना ॥
रावण गातो गीत रामायण ॥ २२ ॥

हे श्रमिकांचे कोण ? करा विचार ॥
छान चालवीती राज्य कारभार ॥
श्रमिकांचे राज्यच नको ॥
ह्यांत चालवीती डोके फार ॥ २३ ॥

# " राधिका "

卐

नर देहाची गांठ पडली ॥
माया मोही राधा अडकली ॥ १ ॥

पाश मायेचे तोडी वनमाळी ॥
वंदिते पाया राधा भोळी ॥ २ ॥

प्रेम भक्ति पिकली राऊळी ॥
प्रभू तूं प्रकाश मी साऊली ॥ ३ ॥

हरिने मुरली वाजविली ॥
राधा नाचत गाऊं लागली ॥ ४ ॥

देहमुक्त राधेची कृष्णा झाली ॥
अज्ञ जनता वहाते लाखोली ॥ ५ ॥

# " कुणास म्हणावें लेवा "

भगवान श्रीकृष्ण देवा बोला ! कुणांस म्हणावें लेवा ॥
न करी कुणाचा द्वेष, हेवा, दावा त्यास म्हणावें लेवा ॥ १ ॥

सज्जनहो ! त्यांना म्हणतात लेवे प्रथम द्यावे मग घ्यावे ॥
अहो रात्र कष्ट करावें राम भजावें मरावें परी कीर्तिरुपे उरावे ॥ २ ॥

मनुष्य स्वभावाचें प्रकार चार सांगितले भर्तृहरिने ॥
लेवे समाजांत आहेत तसे जाणावें आंतरदृष्टीने ॥ ३ ॥

सत्पुरुष, संसारी, राक्षस, मूर्ख प्रकार चार ॥
आपण कसे ? ज्याचा त्याने करावा मनाशीं विचार ॥ ४ ॥

कवि भोजराज लेखक, गायक जातीने आहेत लेवा ॥
रोम रोमी प्रेम भक्ति न जाणें दावा, पावा, कावा ॥ ५ ॥

## " कविता "

प्रभातकालीं मंगल समयीं प्रतिभा आली देवा घरी ॥
हंसत, नाचत, गात शब्दरूपे कविता मारी ललकारी ॥ १ ॥

आम्ही हाडा मांसाचे कवि आहोत वेडे बेडर खरोखरी ॥
हाताने घरांला लावीली आग चिता भस्म कपाळावरी ॥ २ ॥

ओंऽकार आमुचा मंत्र संयम त्याग हेंच निष्काम काम ॥
श्रमिकासाठींच शब्द रचना कवितेत जन्मा येतो राम ॥ ३ ॥

आम्ही जनतेचे सेवक, रक्षक, गुंडांचे कर्दनकाळ ॥
सफेद गुंड आम्हां थरकतात भरली वेळ थोडाच राहीला काळ ॥ ४ ॥

कवि भोजराज रचितात, गातात गरिबांकरितां कविता ॥
श्रमिकांचेच कवितेने जन जागृति भारती येईल समृद्धता ॥ ५ ॥

# " आखाडा "

आम्ही खोदला आखाडा जेव्हां रक्त सळसळत होते ॥
केस ओंठावर नव्हते पिळताच दूध गळत होते ॥ १ ॥

अंगा पिंडाने भरदार आई वडिलांची देणगी होती ॥
दंड, मांड्या पिळून पोलादी पिळदार बनली होती ॥ २ ॥

कुणी वदत " मास्तर, उस्ताद " पाटील गुरुजी ॥
छाती काढणें, डुलत चालणें सारीच सारी नाराजी ॥ ३ ॥

निर्व्यसन पाया, संयम पायरी; प्रभूला भेटायचे होते ॥
कष्टावरील प्रेम भक्तिचे जोरावर सर्वच नाचत होते ॥ ४ ॥

अबला, संरक्षण, पापाला वाचा, आखाडा भाकरी भाजींत होता ॥
शिवबा राणा, मराठी बाणा, जय जय रघूवीर समर्थ होता ॥ ५ ॥

वडार, माने कुस्तीगीर महाराष्ट्र वाघ बनावे हिंद केसरी ॥
नव्हते ध्येय व्यायामानंतर जो तो पोटाचा उद्योग करी ॥ ६ ॥

माना बरोबर धन तालमीत नव्हती घडली मारामारी ॥
" शरिर माद्यं खलु धर्म साधनम् " बलोपासक मंत्र जप करी ॥ ७ ॥

स्वातंत्र्याची आस पारतंत्र्याने झोप उडाली होती ॥
आखाडा जमीनी वरती खालती क्रांति पेटली होती ॥ ८ ॥

कॉंग्रेस, इंग्रज वाद आखाडा कॉंग्रेसचाच होता ॥
इंग्रज राहीले बाजुला शेटजींशीं लढा जुंपला होता ॥ ९ ॥

अरेरे ! शेटजींचा विजय, गुंडांनी आखाडा पेटवीला होता ॥
धडपडणारे तरुणांचे देहाबरोबर आत्मा पेटला होता ॥१०॥

सुंभ जळाला तरी ध्येयाचा पीळ पीळदार होता ॥
श्रमिक गरिब बनले वनवासी तरी भारताचा जयघोष होता ॥११॥

आमुचा आशेचा आखाडा जाळला परंतु सांगाडा उरला होता ॥
देहातील जीव शिवाशी रममाण झालेला होता ॥१२॥

आम्ही काय कमवीले, गमवीले शत्रु कोण ? भेद संपला होता ॥
कवि भोजराजाचा आखाडा सदा खडा प्रभू गीत गात होता ॥१३॥

## " आम्ही पाहिला देव "

★

आम्ही पाहिला देव मोठ्या कष्टाने, तपश्चर्येने ॥
रक्ताचें करूनी पाणी साकारीला उत्पादनाने ॥ १ ॥

समभाव हीच पूजा राबवीला विकेंद्रिय करणानें ॥
योगेश्वर कृष्णरूपे पाहिला ज्ञानमय प्रकाशाने ॥ २ ॥

शास्त्री, पंडित, ह. भ. प. आमुचे कृतीला हंसले ॥
अहंभाव, भोग गर्वामुळेंच हंसणारे सारे फसले ॥ ३ ॥

दगडांत रहातो देव पोटाचे साधन चालतो खोटा प्रचार ॥
कवि भोजराजाला देव देतो सुख शांती आनंद अपार ॥ ४ ॥

# " निवडणूक महिमा "

卐

लोक हंसतात करिती छीः थू ठेवितात नांव ॥
एक मताने डिपाजीत जप्त झाले तुमचे राव ॥ १ ॥

जन्मा आला हेला मान पान भोग भोगता मेला ॥
चौऱ्याशी लक्ष योनि नरदेह निवडणूकीने वाया गेला ॥ २ ॥

धंदा सोपा हातभट्टीचा एक घाव दोन तुकडे ॥
मान धना सोब्रत कवि गीत गातात वाजती चौघडे ॥ ३ ॥

डॉक्टर, वकील, श्रीमंतच बनतात खासदार मिनिष्टर ॥
निवडून येतांच राव श्रमिकांची उडवीतात टर ॥ ४ ॥

भाषेचे भूषण खूप आश्वासन धंदा स्वार्थाचा ॥
कधी नरम, सदा गरम, पुराच बेशरमीचा ॥ ५ ॥

द्यावे आश्वासन, करावा उपदेश नम्रतेचा आव ॥
अशांतता घालती जन्माला मिळतो सोन्याचा भाव ॥ ६ ॥

मते रोख सौख्य उधार आधी भरा माझे घर ॥
महागाई, गरिबी घालवीतो पोकळ शब्दांचाच भार ॥ ७ ॥

कशास पाहिजे समता, त्याग, ध्येय, धारणा ॥
उठल्या बसल्या श्रेष्ठींचें हात लावावा चरणा ॥ ८ ॥

घरचा मातबर, पक्षाचें पंख जातीयता, बाप पुण्याई ॥
प्रसिद्धीचा वाजतों नगारा निवडून येतां भाई ॥ ९ ॥

खावें प्यावें कष्ट करावें स्वाभिमानी जीणे जगावें ॥
सत्य बोलावे, प्रेम अर्पावें लोकशाहीला जपावें ॥ १० ॥

कवि भोजराज प्रार्थितो, श्रमिकांनाच निवडून द्यावें ॥
बकासुराचें जातीचें बांडगुळांना कां पोसावे ॥ ११ ॥

# " भारतीय संस्कृति "

भारतीय संस्कृति उच्च, उच्चांधांची ठरावी ॥
श्रमिक, सामान्य दगड, धोंडे ह्यातच खर्ची पडावी ॥ १ ॥

उच्चवर्णिय, उच्चभ्रू ह्यांनीच ती घडवावी ॥
श्रमिकांनी कानाला झांकून अंध श्रद्धेने ऐकावी ॥ २ ॥

कष्ट नको ! त्याग नको ! गुलामांची माता पिता ठरावी ॥
राजशाही म्हणजेच लोकशाही बोटावरील थुंकी बघावी ॥ ३ ॥

हा महाराष्ट्र ! हा भारत कुणाचा ! बहिरी, मुकी म्हणावी ॥
झांकली मूठ सव्वालाखाची शेटजींची रखेली ठरावी ॥ ४ ॥

कवि भोजराज वदतात उघडा डोळे बघा उच्चभ्रूंची नवलाई ॥
भारतांत संस्कृतिद्वारे चालतो प्रचार श्रमिकांना आहे मनाई ॥ ५ ॥

# " तुम्हांपाशीं आम्ही येवोनिया काय ? "

आम्ही आहोत दे. भ. आमुचे जवळ आश्वासनांचा साचा ॥
तुम्हांपाशी आम्ही येवोनिया काय वृथा शीण आहे चालण्याचा ॥ १ ॥

आम्ही आहोत ह. भ. प. दाखवितो देव गोड आमुचीं वाचा ॥
तुम्हांपाशी आम्ही येवोनिया काय वृथा शीण आहे चालण्याचा ॥ २ ॥

आम्ही आहोत सत्ताधारी सत्तेनेच प्रश्न सोडवायचा ॥
तुम्हांपाशी आम्ही येवोनिया काय वृथा शीण आहे चालण्याचा ॥ ३ ॥

आम्ही आहोत पुंजीपती घेवाण नंतर देवाण शब्द विश्वासाचा ॥
तुम्हापाशी आम्ही येवोनिया काय वृथा शीण आहे चालण्याचा ॥ ४ ॥

आम्ही आहोत शास्त्री, पंडीत, कलाकार वेष प्रचारकाचा ॥
तुम्हांपाशी आम्ही येवोनिया काय वृथा शीण आहे चालण्याचा ॥ ५ ॥

आम्ही आहोत प्राचार्य, डॉक्टर, वकील धंदा धनसंचयाचा ॥
तुम्हापाशी आम्ही येवोनिया काय वृथा शीण आहे चालण्याचा ॥ ६ ॥

आम्ही आहोत श्रमिक निश्चय उत्पादन विकेंद्रीय करण्याचा ॥
भारत आहे आमुचा आम्हालाच राज्यकारभार हांकायचा ॥ ७ ॥

# " लयला मजनू "

मी पाहिला पदवीधर मजनू आणिक सुंदर लयला ॥
धूंद, फूंद, रंगी, ढंगी बेफिकीर जोडा यावलला ॥ १ ॥

नित्य, सांज सकाळी फिरायला जात होते हमरस्त्याने ॥
देहाचे प्रदर्शन नटून थटून नाना वेषभूषेने ॥ २ ॥

गरीब, हमाल, श्रमिक, सौंदर्य भोग हेंच सार ॥
मदिरा संसारांत बाहुल्यांचें घुंगराचा रुमझूम झंकार ॥ ३ ॥

ना कष्ट ना काम धंदा विरह मिलन हाच मंत्र
खावें प्यावें मजा करावें काळा पैसा जाणती तंत्र ॥ ४ ॥

एके दिवशीं बातमी आली शिष्टांच्या वर्तमान पत्रात ॥
लयलेला अपघात मजनू जाऊन बसला तुरूंगांत ॥ ५ ॥

स्टोव्हचा भडका पेटली साडी, झाला लयलेचा अंत ॥
नव्हे ! नव्हे ! मॅन एक तरवारी दोन हत्येसाठी राकेल पसंत ॥ ६ ॥

प्रेमाचे नांव भोग हेच गांव मजनू होता पेशाने पंत ॥
कवि भोजराजला चंगी, भंगी लयला मजनू नापसंत ॥ ७ ॥

# " कवि भोजचं कौतुक जगानं कां करावं ? "

आमुचे जवळ फक्त श्रम हीच किमया ॥
कष्टानेच आम्ही निर्मिली श्रमिक दुनिया ॥
सत्ता संपत्तीचा लोभ येव्हढंच ज्यांना कळतं ॥
सौख्य भोगाकडेच ज्यांचं मन वळतं ॥
त्यांनी आम्हांला कां जवळ घ्यावं ॥
कवि भोजचं कौतुक जगानं कां करावं ॥ १ ॥

जे चकाकतं ते सोनं नव्हे ! आम्हांला ठावं ॥
सोन्याला कस लागतो म्हणून पितळ बनावं ॥
काय कमवावं, गमवावं ज्यांना नच ठावं ॥
उगीच त्यांनी आमुचेशी कां डोकं लावावं ॥
कवि भोजचं कौतुक जगानं कां करावं ? ॥ २ ॥

आम्हांला ना भीति ना खेद ना खंत ॥
विद्येनेच आम्ही बनलो श्रमिक संत ॥
कोण आम्हां वंदीतो निंदतो कां आम्ही बघावं ॥
प्रेममार्ग आक्रमितांना प्रभूगीत गान गावं ॥
कवि भोजचं कौतुक जगानं कां करावं ? ॥ ३ ॥

आम्ही स्वीकारतो पक्ष न्या या चा ॥
श्रमिक हित पंथ आमुचा सत्याचा ॥
राम नामाचा जप बाणा असि धारेचा ॥
शिष्टांचे राज्य शिष्टांनी भुरळ थापेचंच गीत गावं ॥
कवि भोजचं कौतुक जगानं कां करावं ? ॥ ४ ॥

जाहिरांत ही रहाते रावांची बाजी ॥
प्रसिद्धि ठरते त्यांचा आजोबा आजी ॥
कष्टानेच शांती खातो भाकरी आणि भाजी ॥
त्यामुळेच धनलोभी वदतात साम्यवादी पाजी ॥
नकट्यांनी सदा नाकच घाशीत रहावं ॥
कवि भोजचं कौतुक जगानं कां करावं ? ॥ ५ ॥

## " डोळे उघडा श्रमिकांनो "

★

आम्ही बुद्धिजीवींचे आचारी निवडणुकीने ठरतो पुढारी ॥
करितो पांढरपेशांची एकी श्रमिकांत बेकी भजतो रामकृष्णहरी ॥ १ ॥

आम्हांस भारती काम वर्तमानपत्र चालविणें व्यासपीठ सांभाळणें ॥
खूप बोलणें, ठराव करणें, प्रचाराने श्रमिकांना भुलवीणें ॥ २ ॥

रोमरोमी श्रमिकाबद्दल द्वेष, संस्कृती अलग, भाषा आणि वेष ॥
त्यागाचे नांव घेत भोगतो भोग नित्य प्रसिद्धीचा अभिषेक ॥ ३ ॥

देश आमुचा देव आमुचा आहे शिक्का मोर्तब भारतावरी ॥
नवरा नवरी मरो नसे सुतक घेतो दक्षणा क्रिया कर्मांतरी ॥ ४ ॥

आमुची संघटणा पोलादी भटजी सती शेटजी ठरतो पती ॥
कवि भोजराज ओरडतात डोळे उघडा श्रमिकांनो टाळा आपत्ती ॥ ५ ॥

# 'श्रमिक राज्य बुडतांना डोळ्यांतून अश्रू गाळावं'

ब्रॅन्डीचे बाटलीचे नाटक लिहितांच हाऊस फुल्ल व्हावं ॥
बटाट्याच्या चाळीतील चाळा बघून खदखदां हसावं ॥ १ ॥

पांढऱ्या ढगांतून पडतो पाऊस नाले ओढे भरून जावं ॥
काश्मीरचा गुलाब हुंगताच श्रमिकांना काटा बोचावं ॥ २ ॥

एक चाकाचा तनपूरे रथ ओढीत घोडं दिल्लीला भिडावं ॥
मृतप्राय उच्चभ्रू स्वामीने गरिबांच्या डोक्यावर मीरे वाटावं ॥ ३ ॥

शेटजी राज्यांतील भटजी शिवायन धान्य, कपडा, निवारा ठरावं ॥
मृत्यूवर मिळताच जय पुणे भागाचे नांव महाराष्ट्रांत दुमदुमावं ॥ ४ ॥

पिपांत पडला मेला उंदीर रसायन द्राक्षासव म्हटलं जावं ॥
श्रमिकांचे केळे, हापूस, उसाचा रस उंदीर मांजरांनी प्यावं ॥ ५ ॥

भोग नका बघू कविता बघतांच विनायक गीत गावं ॥
श्रमिकांचे कोटी भास्करास दिवाभीत समजून अंधारांत दडपावं ॥ ६ ॥

उच्चवर्णिय नाऱ्याचं भारतांत वेडवाकड लिखाण वेद ठरावं ॥
श्रमिकांचा मूर्गा राबतो सुभानच कौतुक बांगकडे दुर्लक्ष व्हावं ॥ ७ ॥

भटजी लेखक शेटजीचे प्रकाशन खडकावर मोती उगावं ॥
धरतीचे लेकरांची ज्वारी, बाजरी माती मोलानं विकली जावं ॥ ८ ॥

गायनाने फुले उमलतात, वसंत बहरतो, दिवा लागतो आम्ही दिवे ओवाळावं ॥
गरिबांचे गाणें रडगाऱ्हाणे ठरतांच रेडिओतून लतेचेच गाणं ऐकावं ॥ ९ ॥

महाराष्ट्रांत पांढरे पायाचे पेशींनी कांहीही बोलावं लिहावं ॥
श्रीमंतांचे पाप पचवण्यासाठी शेटजीचे वर्तमान पत्र चाळावं ॥ १० ॥

द्रुकसेना, शीवसेना नीवाडा, पवाडा पोवाडाच ठरावं ॥
श्रमिक आंधळे, मुके समजून शिष्टांनी मुंबई जाळावं ॥ ११ ॥

कवि भोजराज वदतात श्रमिकांनी एकदां मलबारहीलवर जावं ॥
साहित्याच्या सागरांत श्रमिकराज्य बुडतांना डोळ्यांतून अश्रू गाळावं ॥१२॥

## " आदर्श संसार "

वय वर्षे बावन्न कष्ट, सेवा ह्यांतच आमुचा जन्म गेला ॥
उच्चभ्रूंचे मते जन्मा आला हेला पाणी भरता भरता मेला ॥ १ ॥

अनुभव अनुभूतिचे ज्ञान केस रूपेरी सोनेरी बनवीले ॥
स्वार्थी आचार्य, प्राचार्य वदतात थंडी, उन्हांत वाळवीले ॥ २ ॥

पस्तीस वर्षांचा संसार आम्ही गुणांनी गौरीशंकर गांठला ॥
सत्ताधारी प्रचारकांचा मंत्र कष्टकऱ्यांना मारक ठरला ॥ ३ ॥

आम्ही जगावें कसें ? राज्य आमुचे स्वार्थ भोग प्रचार ठरलेला ॥
ऐकावे संतांचे खावे कष्टाचे संत मार्गच आम्ही आक्रमीला ॥ ४ ॥

कवि भोजराजाचा संसार श्रमिकाकरिता स्वच्छ आरसा बनला ॥
जो जसा पाहील तसे रूप रंग कष्ट त्यागच आदर्श ठरला ॥ ५ ॥

# " श्रमिक जागृति गीत "

卐

खुदाने डरावे पाहिजे ते बंगल्यातच द्यावे ॥
म्हणूनच मी मलबार हीलवर नंगा झालो ॥ १ ॥

सो चुहे खाके बील्ली (फॉरेन) हजला गेली ॥
रोजा सोडणेसाठीं परत मायभूमि आली ॥ २ ॥

मावंद्यासाठी जमले सगळे बगळे भक्त ॥
विषयांतून निघाला विषय सारेच विषयासक्त ॥ ३ ॥

जो देगा दान उसका भला झोळीत लाचारी आहे ॥
शेळीला खाण्याची त्यामुळेच वाघाला परवानगीं आहे ॥ ४ ॥

बोलतो तसेच चालतो मुखी विभूति गाणी आहे ॥
दे. भ. ह. भ. प. ह्यांचे वाणीला हिंसेची धार आहे ॥ ५ ॥

लाखो कोटी श्रमिक संत पंढरीला पायाने जातात ॥
डोक्याने चालणारे पंत मोटारीलाच विठोबा मानतात ॥ ६ ॥

सत्ताधारी, सत्तेतून भारतात मिळवितात सत्ता ॥
श्रमिक रात्रंदिन राबतात मुष्किलींने मिळतो भत्ता ॥ ७ ॥

—००—

# " चंद्रकोर आशेची "

★

आकाशीच्या अंगणात ।।
विखुरले तारे ।।
बघतां चंद्र पुनवेचा ।।
देहभान हरे ।।१।।

कळी मध्यें कळी
कळी कण्हेरीची ।।
उकलली मन अढी ।।
खुडता मोगऱ्याची ।।२।।

हिरे माणिक मोती ।।
दडती पृथ्वी पोटी ।।
झाले मन मोहित ।।
पहिल्या गांठी भेटी ।।३।।

चाफ्या मध्यें चाफा
शोभे सोन चाफा ।।
सुवासे मन गुंगलें
हुंगता हिरवा चाफा ।।४।।

खेळां मध्यें खेळ ।।
चोर शिपायाचा ।।
पत्ता लावीता दमले ।।
ना पत्ता हृदयाचा ।।५।।

जीवनांत पसरे अंधार ॥
रात्र निराशेची ॥
भाग्यवती उगवे पश्चिम ॥
चंद्रकोर आशेची ॥६॥

# " प्रश्न श्रमिकांनीच आहे सोडवायचा "

आम्ही केला अभ्यास राजकीय पक्ष उच्चभ्रू पुढाऱ्यांचा ॥
घडतां अद्दल केला निश्चय यापुढें पुढाऱ्यांचें नादी न लागायचा ॥ १ ॥

निवडणुकीचें अगोदर राव निवडणूक पुरतांच नम्रतेचा आव ॥
निवडून येतांच सत्कार, समारंभ, प्रचाराने मिळतो सोन्याचा भाव ॥ २ ॥

श्रमिकहीत नावांखाली चालते देशबाजी पक्ष निंदा प्रचार ॥
श्रमिकांचा बोल घेवड्यांशी काय संबंध साराच काळा बाजार ॥ ३ ॥

राजकारण हाच धंदा प्रचाराने बनतात लोक नायक ॥
श्रमाशीं ज्यांचे वाकडे भासवीतात श्रमिक हितचिंतक ॥ ४ ॥

कवि भोजराज विनवीतात सोडा नाद ढोंगी पुढाऱ्यांचा ॥
करा कष्ट, अभ्यास देशाचा प्रश्न श्रमिकांनीच आहे सोडवायचा ॥ ५ ॥

# " पेन्शनर "

आम्हां पडले जीवनाचें कोडे ॥
खूप शिकल्यानें झालो वेडे ॥ १ ॥

कष्ट करावें पोट भरावें ॥
वाड वडील जगले तसे जगावें ॥ २ ॥

छेः ! छेः ! इंग्रजी शिकून काय उपयोग ॥
पैशाशिवाय कां मिळते वैभव ऐश्वर्य भोग ॥ ३ ॥

नच देहाला मळ रेशमी सुटाला सळ ॥
पांढरपेशे जीवन जगावें हीच एक तळमळ ॥ ४ ॥

काय करावें कोठे जावे कुणांला भेटावे ॥
रात्रंदीन एक चिंता परी मार्ग न ठावे ॥ ५ ॥

शेवटी पाय धरीले भटजीचे दाखवीला हात ॥
गुरुमंत्र मिळतांच सरळ गेलो भरती ऑफीसांत ॥ ६ ॥

कोण नर, कुठचा नारायण, रामभक्त वानर ॥
शेटजी राज्यांत केली नौकरी बनलो पेन्शनर ॥ ७ ॥

—००—

# " स्वर्ग आणि नर्क "

गंधर्वाचे गायन अप्सरेचा नाच मदीरा मदिराक्षी स्वर्गात आहे ॥
कष्टाचें नांव नको भव्य, दिव्य देवावरील श्रद्धा आंधळी आहे ॥ १ ॥

कावा, दावा, पावा धनसंचयाने स्वर्गाचा पाया रचिला आहे ॥
वशिला पैसा हाजी हाजी विभूति पूजेने कळस शोभला आहे ॥ २ ॥

तामस, राजस वृत्तीचे संगमरवरी पाषाण स्वर्गाच्या पायऱ्या आहेत ॥
वर्तमान पत्र, ग्रंथ व्यासपीठ स्वर्गाचे नाक, कान, डोळे आहेत ॥ ३ ॥

विषमता, भेदाभेद, फोडा, झोडा, सोडा अशांतता घंटानाद आहे ॥
शेटजीसाठी होम हवन रावांचे बाजींत स्वर्ग व्यापला आहे ॥ ४ ॥

भक्तांचा नाश, वनवास भगत, भोप्यांचे ताब्यांत स्वर्ग आहे ॥
कुणाला नर्क कुणाला स्वर्ग बोळवण लार्डाचे हातांत माळा आहे ॥ ५ ॥

दिल्लीचा स्वर्ग नेहमीच लक्ष्मीनारायणाचें ताब्यांत आहे ॥
शेटजीचा देह भटजीचा आत्मा स्वर्ग हा हवाबंद पोलादी आहे ॥ ६ ॥

कोटयावधी श्रमिकांसाठी भारतांत नर्कवास खुला आहे ॥
रक्ताचें करूनी पाणी देवांना पोसणे शेतकऱ्यांचें कर्तव्य आहे ॥ ७ ॥

देव देतील ते खावे प्यावें रात्रंदिवस देवांचे भजन गांवे ॥
शेतकरी, कामकरी, गुलामांना कष्टानंतर येवढेच काम आहे ॥ ८ ॥

लार्ड देव बघायचा झाला तर गीतेच्या दहाव्या अध्यायांत आहे ॥
देवाला कष्ट नको ! भटजीची थाप श्रमिकासाठीं पाप आहे ॥ ९ ॥

कवि भोजराज वदतात कष्ट, उत्पादन, वाटणीचा स्वर्ग सात्विक आहे ॥
राक्षसवृत्तींचे कविंनी स्वर्ग, नर्क प्रचारांकरितां कल्पिला आहे ॥ १० ॥

# "प्रेमाची कहाणी"

प्रेम कशांस म्हणावें आम्ही शीकलों नाहीं ॥
त्यामुळें प्रेम कुणांवर केले ते कळलेच नाहीं ॥ १ ॥

प्रेमाची परिक्षा नापास मानांत अपमान राही ॥
प्रेमानें जग जिंकावें कुणांलाच जिंकता आले नाहीं ॥ २ ॥

प्रेमाचा बडेजाव, प्रेमाचें प्रदर्शन आम्हां ठाऊक नाहीं ॥
तरीच प्रसिद्धि आमुच्या जवळपास फिरकली नाहीं ॥ ३ ॥

प्रेमाची थोरवी थोर थोरांच्यामते श्रमिक पोरांचा पोर ॥
पोलीस असुनी म्हणतात प्रेमवीर, पागल, चोर ॥ ४ ॥

नाशवंत देह लोटीला ज्ञानसागरांत ॥
नित्य अंतरात्मा राबवीला परमात्म्यांत ॥ ५ ॥

नाका तोंडांत जातांच ज्ञानसागराचें पाणी ॥
हृदय, नयन वाचेंतून स्रवली अमृत वाणी ॥ ६ ॥

शारदा विणेवर आत्मा गातांच प्रभूगाणीं ॥
तेथूनच सुरूं जहाली प्रेमाची पवित्र कहाणी ॥ ७ ॥

कवि भोजराज प्रेमाची मूर्ति शांतीचा सागर ॥
श्रमिकांसाठींच तळमळतो जीव प्रेम हेंच जीवन सार ॥ ८ ॥

# "दास-प्रभूचा"

संसार हेचि मर्म, कर्तव्य कर्म, घातला बांध ॥
बंधनाचा ॥ १ ॥

मनाचा मोर, पळतां चोर, गुंडाळला दोर ॥
संयमनाचा ॥ २ ॥

लोभ वाळला राग जाळला धरीला पंथ ॥
विवेकाचा ॥ ३ ॥

अहिंसेची तरवार करितो मी वार धंदा माझा ॥
वारकऱ्याचा ॥ ४ ॥

तुकयाने बोलावें, तैसेची चालावे, वहातो सदाभार ॥
गाथेचा ॥ ५ ॥

पांडुरंगाची वाट, सदाशीवाची भेट शिष्य मी आहे ॥
साऱ्यांचा ॥ ६ ॥

आई कस्तुरबा बाप मोहनचंद गातो महिमा ॥
गांधीचा ॥ ७ ॥

कवि भोजराज प्रेमाचें आगर गुणांचा सागर ॥
दास प्रभूचा ॥ ८ ॥

# " मायबाप सरकार "

स्वर्ग स्वर्गीय देवताच आम्ही सरकार कल्पिले ॥
शूर, उदार, दयाळूधी म्हणून वंदीले ॥
सत्यं, शिवं, सुंदरम् न्यायदेवतेचें स्वागत केले ॥
सन्मित्र, सखी समजून सर्वांगी चुंबलें ॥
आमुचे सरकार म्हणूनच लोटांगण घातले ॥
मायबाप सरकारलाच सेवा, तन, मन अर्पिले ॥
लोकशाहीत श्रमिक उपाशी बघतांच नयनी पाणी आले ॥
कवि भोजराजचें हृदय विषमता बघून हेलावले ॥

# " प्रकट होऊनि नासावें ! हें बरें नव्हें ! "

卐

अभ्यासातुनि पदवी संपादावें ॥
पदवीतुनी सत्ता, संपत्ति वाढवावें ॥
भरल्या पोटीं ज्ञान प्राप्त व्हावें ॥
उपाशी पोटांला उपदेश करीत सुटावें ॥
श्रमिक, अडाणी, मूर्ख समजले जावें ॥
विंचवाचा दंश, ज्ञानी म्हणून सिरवावें ॥
प्रकट होऊनि नासावें ! हें बरें नव्हें ! ॥

# “ जगा तुझी सारी तऱ्हाच न्यारी ”

★

दाऊनी आशा गेला पुढे तो पुढारी ॥
मंदिरांत शिरला प्रथम ठरला पुजारी ॥
संतसंगे अकिंचन वदती भिकारी ॥
जगा तुझी सारी तऱ्हाच न्यारी ॥ १ ॥

विद्येनेच विनय दिसतसे नम्र भारी ॥
पहिला वर्ग पास गर्व प्रसिद्धी तारी ॥
सत्ता, संपत्ती, कसोटी परिक्षा बहादुरी ॥
जगा तुझी सारी तऱ्हाच न्यारीं ॥ २ ॥

कष्टाचा जो वरी मिळते उपदेश पुरी ॥
समजून बैल पक्षांध बांधती पट्टी डोळ्यावरी ॥
हरळी चरतो घोडा लगाम साहेबाचें करी ॥
जगा तुझी सारी तऱ्हाच न्यारी ऽ ॥ ३ ॥

जो तो समाजवादाची फसवी घोषणा करी ॥
कष्टापेक्षां श्रद्धा असे राजकारणावरी ॥
उच्च, प्रसिद्ध पुरुषच ठरती माळकरीं ॥
जगा तुझी सारी तऱ्हाच न्यारी ॥ ४ ॥

कष्टाने भूक लागते काम खाते भाजी भाकरी ॥
उपाशी पोटीच मजूर उत्पादनवाढ करी ॥
“ घ्याहो ! लाडू आणिक ” आग्रह भरल्या पोटी करी ॥
जगा तुझी सारी तऱ्हाच न्यारी ऽ ॥ ५ ॥

मित्रहो ! करा कष्ट जागवा कष्टकरी कामकरी ॥
उत्पादन ज्याचे हाती तोच राहील पुढारी ॥
कवि भोजराज श्रमिकांना विनंती करी ।
कष्टकऱ्यांचेच हाती द्या भारताची दोरी ॥ ६ ॥

## " सावधान "

सावधान ! सावधान !! सावधान !!! ॥
कष्ट कऱ्यांनो, शेतकऱ्यांनो, कामकऱ्यांनो ॥
सावधान ! सावधान !! सावधान !!! ॥ १ ॥

शेटजीचें जाळे भटजींचें चाळे आले श्रमिकांचे कंठी प्राण ॥
कष्टाशी ज्यांचे वाकडे भारती तेच घालतात थैमान ॥
सावधान ! सावधान !! सावधान !!! ॥ २ ॥

इंग्रजी हटाव ! रख्खो ! हिंदी हटाव संस्कृत रख्खो ॥
सुधारणावादी स्वार्थी, ढोंगी, ऐतखाऊंचें ऐका फसवे गान ॥
सावधान ! सावधान !! सावधान !!! ॥ ३ ॥

कष्ट करा ! कष्ट करा ! पिकवा धन धान ॥
लुटारु ओरडतो चोर ! चोर ! ठेवा अवधान ॥
सावधान ! सावधान !! सावधान !!! ॥ ४ ॥

घेराव, सत्याग्रह, भाषणें येव्हढेच ज्यांना काम ॥
बकासूर, भस्मासूर, मारिच्यांनी पेरीले सारे अज्ञान ॥
सावधान ! सावधान !! सावधान !!! ॥ ५ ॥

देशाचें शत्रु मित्र कोण? साथींनो ठेवा जरा भान ॥
शेटजी पत्रांतून करितात प्रचार कोटींची चिरतात मान ॥
सावधान! सावधान!! सावधान!!! ॥ ६ ॥

श्रमिकांनो घ्या हातांत डफ तुणतुणें गा श्रमिक गान ॥
जागवा लाखो कोटींना तुम्हांला भारत मातेची आन ॥
सावधान! सावधान!! सावधान!!! ॥ ७ ॥

फाडा इतिहासाची पानें घडवा भारत नवा व छान ॥
जे करितात रक्ताचे पाणी त्यांचेच गा गुणगान ॥
सावधान! सावधान!! सावधान!!! ॥ ८ ॥

भारतात उच्चभ्रूंना एकच काम श्रमिकांचे टोचतात कान ॥
विषमता, दंगा, धोपा ह्यांतून फॅसिष्ट मारितात वरतान ॥
सावधान! सावधान!! सावधान!!! ॥ ९ ॥

धर्म भेद, भाषाभेद प्रांतभेद पाडणें येवढेच ह्यांना काम ॥
आयत्या बिळावरचें नागोबा वदतात आम्हीच आहोत राम
सावधान! सावधान!! सावधान!!! ॥ १० ॥

भारत लार्डांचे हातांत सत्ता हेंच ध्येय धारणा ॥
कष्टावरती नसे श्रद्धा करिती फसवी घोषणा ॥
सावधान! सावधान!! सावधान!!! ॥ ११ ॥

कवि भोजराज प्रार्थितो कष्टाबरोबर करा सर्वस्वदान ॥
श्रमिकच हांकतील राज्यकारभार बाकी ठरतील नादान ॥
सावधान! सावधान!! सावधान!!! ॥ १२ ॥



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ...२००... दि. ...

# ॥ संतकृपा मजवर झाली ॥

लागले वळण इंद्रिया एक एका ॥
रात्री स्वप्नांत माझ्या आला तुका ॥ १ ॥

देव भावाचा असे भुकेला ॥
तरीच रहातो तो एकला ॥ २ ॥

देव दिसतो सदा उपाशी ।
नित्य खातो भक्ति तुपाशीं ॥ ३ ॥

देवाला संतांनी आकार दिला ॥
बाप रुकमा देवी वरुं शोभला ॥ ४ ॥

अगा वैकुंठ आले भुवरी ॥
पांडुरंग करितो चाकरी ॥ ५ ॥

भाव भक्ति माझी फळा आली ॥
संतकृपा मजवर झाली ॥ ६ ॥

भोजराजाला कशाची कमतरती ॥
छत्र चामरे कृपेची झळकती ॥ ७ ॥

# "कवि आणि कविता"

कवि म्हणजे काय प्रश्न गहन आहे ॥
कवितेची जन्मदात्री हे त्याचें उत्तर आहे ॥ १ ॥

कवितेचा अर्थ काय ? कोणीतरी सांगा हो ! ॥
गुदद्वारानें नव्हे वाचे गोड बोला हो ! ॥ २ ॥

नादासाठीं शब्द अर्थासाठीं कविता रचना ॥
मनोरंजन, ज्ञानाची पायरी गांठावें प्रभूचरणा ॥ ३ ॥

कविता अन्न आहे पाणी आहे हवा आहे ॥
देवाने मानवाकरितां दिलेले वरदान आहे ॥ ४ ॥

कविता म्हणजे विनोद, गंमत रावांची बाजी आहे ॥
सनातन्यांची दगड पूजा मूर्तिमंत प्रचार आहे ॥ ५ ॥

कविता म्हणजे काच, सोने, हिरकणी आहे ॥
श्रीमंतांनी गरिबावर आणलेले संकट आहे ॥ ६ ॥

कवितेला काळ, वेळ, विषय, बांध बंधन आहे ॥
श्रमिकासाठीं तोंडबंद बुद्धिजीवींचा रेडिओ आहे ॥ ७ ॥

गरिबांचे कवितेला जन्म आहे परंतू वाढ नाहीं ॥
श्रीमंतांचे कवितेला वाढ आहे मरणे ठाऊक नाहीं ॥ ८ ॥

कवितेला जात, पंथ, धर्म, डावा, उजवा भाग आहे ॥
लाखो कविंची शर्यत उच्च वर्णियांनाच मान आहे ॥ ९ ॥

श्रमिक सामान्य खेडवळ कवित बेकी मत्सर आहे ॥
शहरवासी पांढऱ्या पेशींनी तो निर्माण केला आहे ॥ १० ॥

हिंदूंची कविता मुसलमान गात आहेत ॥
मुसलमानांची कविता हिंदू भजत आहेत ॥ ११ ॥

डबक्यांतील कविता बेडूक उचसुरांत गात आहेत ॥
आकाशांतील कविता मेघराग आळवीत आहेत ॥ १२ ॥

कवि म्हणजे काय प्रश्न गहन आहे ॥
कवितेची जन्मदात्री हे त्याचे उत्तर आहे ॥ धृ ॥

कविता म्हणजे अन्याया विरुद्ध पुकार आहे ॥
अंधासाठी काठी अडाण्या करितां प्रकाश आहे ॥ १३ ॥

रोगियासाठी औषधाचे दुकान आहे ॥
मृतात्म्यासाठी संजीवनी विद्या आहे ॥ १४ ॥

कवि हा वेडा आहे कविता ही वेडी आहे ॥
वेड्यांच्या बाजारांत खरेदी विक्री चालू आहे ॥ १५ ॥

वेड्यांचे कवितेत गोलं गोल पोलं पोल आहे ॥
वेड लावणारांची कविता अनमोल आहे ॥ १६ ॥

द्रष्टे कविंचा संबंध सतीशी जोडला आहे ॥
जीवंतपणी जोडे मेल्यावर पेढ्यांचा वर्षाव आहे ॥ १७ ॥

धर्म, राजकारण, सुधारणा कवितेत भरली आहे ॥
मेंदुचें विजकेंद्राशी मन बुद्धिच्या तारा जोडल्या आहेत ॥ १८ ॥

आचार, विचार, अनुभूतीची वीज जोरांत वहात आहे ॥
जेव्हढा बल्ब तेव्हढा प्रकाश रवि पेक्षां कवि श्रेष्ठ आहे ॥ १९ ॥

कवितेला जात, धर्म, प्रांत, देश, भाषा आहे ॥
चौदा भाषिकांची भाषा एकच ब्राह्मणी तिचें नांव आहे ॥ २० ॥

उच्चभ्रूंचे कवितेला कष्ट ठाऊक नाही प्रसिद्धीचा वाटा आहे ॥
समाजवाद ह्या रामनामांतून रक्त शोषण चालू आहे ॥ २१ ॥

श्रमिक, सामान्य, खेडवळ कवित्त बेकी मत्सर आहे ।
बुद्धिजीवी टीकाकारांनी तो प्रचाराकरितां निर्मिला आहे ॥ २२ ॥

कवि म्हणजे काय प्रश्न गहन आहे ? ॥
कवितेची जन्मदात्री हे त्याचें उत्तर आहे ॥ धृ ॥

कलेक्टर, मिनिष्टरांचे बोलसुद्धां किंचीत कविताच आहेत ॥
ज्याचा जसा भाव त्याच रागदारीतून गायीला जात आहे ॥ २३ ॥

शाळांखात्यांतील कवितासुद्धां अजब कारखाना आहे ॥
प्राथमिक, माध्यमिकांचे छातीवर आचार्योंची कविता नाचत आहे॥ २४ ॥

कविता करा ! कविता करा ! करूं नका ! करूं नका !!!
अशिष्टांनी करूं नये शिष्टांनी करावी येव्हढाच अर्थ आहे ॥ २५ ॥

कवितेला जात, धर्माचें वृत्त फुलांतून सुगंध सुटला आहे ॥
जात्यंध, धर्मांधाचे फुलातून दुर्गंध पसरला आहे ॥ २६ ॥

मूठभर, गाडीभरांचेच कवितेला ताल, सूर, बोल आहे ॥
श्रमिकांचा कविता सागर भेदी अगस्तीने आटविला आहे ॥ २७ ॥

कवितेचा आत्मा परमात्मा श्रमिक मानीत आहेत ॥
सत्ता हाच परमात्मा समजणारे परम आत्मे ठरत आहेत ॥ २८ ॥

कवितेचा अनुवाद भाषांतर, प्रचार ठरलेला आहे ॥
रावाकरितां दिपवाळी रंका करिता होळी आहे ॥ २९ ॥

कविता ही ऑयस्क्रिम जनता क्वॉलिटी आहे ॥
रसिका करितां गोरीगोमटी अरसिका करितां काली कलोटी आहे ॥ ३० ॥

कवि म्हणजे काय प्रश्न गहन आहे ॥
कवितेची जन्मदात्री हे त्याचे उत्तर आहे ॥ ध्रु ॥

कवितेची शेपटी चिंध्या गुंडाळीत लंका जाळीत आहे ॥
कुंभकर्णाकरितां रावणायन मारोती करितां रामायण आहे ॥ ३३ ॥

खेड्यांतील लोक शहरांत कविता शिकायला जातात ॥
शहरांतील लोक खेड्यांत कविता शिकवायला येतात ॥ ३४ ॥

दोघांत श्रेष्ठ कोण ? वाद विवाद चालतां ॥
शब्दांतून दुगाण्या झाडतांना दिसतात ॥ ३५ ॥

कवि म्हणजे काय प्रश्न गहन आहे ! ॥
कवितेची जन्मदात्री हे त्याचे उत्तर आहे ॥ ध्र ॥

कविपेक्षां गायिकेला इंडिया रेडिओचा भाव आहे ॥
श्रमिक कवि मरतुकडा गायिका अमर आहे ॥ ३६ ॥

अरेरे ! गायिका अमर हिरा मरण पावली आहे ॥
फर्माईसकार वदतात ती रेकार्डींगवासी झाली आहे ॥ ३७ ॥

"आराम है हराम" शब्दां शब्दांत रस भरला आहे ॥
भाग्य विधात्याचें बोल फोल ठरले आहेत ॥ ३८ ॥

निधर्मी राज्यांतील राम धर्मी राज्यांत गेला आहे ॥
दिल्लीचा ब्रह्मांडनायक राम उच्चभ्रूंचाच ठरला आहे ॥ ३९ ॥

किशानांचा राम भारतांत उत्पादन वाढवीत आहे ॥
श्रमिकांचा काळ रावण मंदोदरी म्हणत सिता पळवीत आहे ॥ ४० ॥

" जय किसान जय जवान " कवितेला अर्थ आहे ॥
अर्थाची व्यापकता लांबत ताश्कंदला भिडली आहे ॥ ४१ ॥

पंढरपुरला गेलेला वारकरी वैकुंठवासी झाला आहे ॥
कोटी किसान जवान रडतात धाय धाय बडबे वदतात
बिठोबा आमुचा आहे ॥ ४२ ॥

पूर्व गोलार्धांत पाश्चिमात्य संस्कृती सामावली आहे ॥
पाश्चिमात्यांनी पूर्व खाऊन पिऊन पचवली आहे ॥ ४३ ॥

पृथ्वीवर उचभूंत काळा गोरा उच्च नीच भेद आहे ॥
असामान्य द्रष्टा कोण ? युनोला प्रश्न भेडसावीत आहे ॥ ४४ ॥

" जय गवंडी जय सुतार " पाऊलावर पाऊल पडत आहे ॥
कऱ्हाडचे वऱ्हाड दिल्लीला गेल्यावर उच्च परंपरा चाल-
वीत आहे ॥ ४५ ॥

" जो देगा उसका भला न देगा उसका भला " राजस
वृत्ति आहे ॥
शेळया वाघ कोंडतांना वाघ शेळीला खात आहे ॥ ४६ ॥

किसानांचे पोरांचे पाऊल महाराष्ट्रांत वाकडे पडत आहे ॥
पडतांना ठेचाळला तरी " जय कॉंग्रेस जय भवानी
बोलत आहे ॥ ४७ ॥

महाराष्ट्रांत गवंड्याचा पोर कविता करीत आहे ॥
शंबुक म्हणून वशिष्ट रामाकडोन वाळीत टाकीत आहे ॥ ४८ ॥

महामंत्र्याचें पुटनिक पूर्व पश्चिम गोलांत पुटपुटत आहे ॥
भारत उच्चवर्णिय उच्चभ्रूंचाच घटना राबवीली जात आहे ॥ ४९ ॥

नांगर धरा पाणी भरा पिकवा गहू हरभरा ॥
उच्च जातियवादी पुढाऱ्यांचा संदेश अभ्यास करा ॥ ५० ॥

पोटाला चिमटा काम करा ढेरपोट्यांचे पोट भरा ॥
मुंबई, कलकत्ता मद्रास, दिल्लीचे पंडितांचे पाय धरा ॥ ५१ ॥

लेखणी मोडा हाती तरवार धरा पुढे काय करा ॥
हिंसेचे पंचारतीने क्रान्तिकारक कविंना ओवाळणी करा ॥ ५२ ॥

"जय जगत जय मानवता" सर्वोदय अखंड काव्य आहे ॥
एकाच जातीचे आचार्य प्रकाशांत लाखो अंधारांत गडप आहेत ॥ ५३ ॥

कवि म्हणजे काय प्रश्न गहन आहे ॥
कवितेची जन्मदात्री हे त्याचे उत्तर आहे ॥

पुणे मुंबईचा कवि कालीदास, भवभूति आहे ॥
आपला तो बाळाजीपंत श्रमिकांचा तो कारटा आहे ॥ ५४ ॥

लाखो खेड्यांतील श्रमिक कविंचे वावडे आहे ॥
खेडेनाम भूतान सर्वच सामान्यनाम आहे ॥ ५५ ॥

उच्चभ्रूंचेच कवितेची भारती भरती, चलती आहे ॥
टीका, टीकाकार, टीपणी मिरवली जात आहे ॥ ५६ ॥

श्रमिक हा मनुष्यच का ! शंका कुशंका येत आहे ॥
उच्चभ्रू हेंच देवता जोरांत प्रचार कार्य चालू आहे ॥ ५७ ॥

उच्चवर्णिय स्त्रीकेसर, उच्चभ्रू पूं केसर,
हायब्रीड कविता पिकवा ॥
खूप हायब्रीड पिकल्यांवर उच्च कविंनाच फक्त जगवा ॥ ५८ ॥

रेडिओ वर्तमानपत्र व्यासपीठ रंगमंच द्वारे प्रचार कला ॥
उच्चभ्रू शकुनि, कर्ण, चाणाक्य, सूर्याजी, कलुषा
हाकलू मंथरेला ॥ ५९ ॥

श्रमिक हेंच देव मारीच राक्षसांनीं घेरीले भारताला ॥
करुं सुटका कोटी देवांची आम्ही ठाम निश्चय केला ॥ ६० ॥

कथा, कादंबरी, नाटक, निबंध, टीका कविता माऊली ॥
उच्चांधांनो कां फसवीता श्रमिकांना सारी प्रभूची साऊली ॥ ६१ ॥

लाखो कोटींचा महात्मा मोहात्म्यांनी ठार केला आहे ॥
जातियतेचे पापक्षालनासाठीं भारती होमहवन चालू आहे ॥ ६२ ॥

तुका म्हणे उगे रहा जे जे होईल ते ते पहा ॥
नाठाळांच्या राज्यांत ज्ञानाची काठी घेऊन कार्य करा ॥ ६३ ॥

भारती रात्रंदीन आम्हां आहे युद्धाचा प्रसंग ॥
आंतरबाह्य मन जाणूं वैऱ्याचे अंतरंग ॥ ६४ ॥

प्रथम श्रम, उत्पादन मग करूं रामभजन ॥
दुष्ट, शिष्टांची नको दलाली आम्हां कळते राजकारण ॥ ६५ ॥

आम्हा नको भोग, मुक्ति, आराम, धन, मोटार, विमान ॥
विद्या कलेचे वेड समाधानी राखूं देव, देशांशीं ईमान ॥ ६६ ॥

शक्ति, बुद्धीचा अणुबाम जागवूं कोटी कोटी ॥
देऊं झुंज उच्चभ्रूंशीं, आमुचे पाठी जगत् जेठी ॥ ६७ ॥

माय मराठी, बाप हिंदी नच कुणा भाषेशी भांडण ॥
करूं आत्मसात थोडी समता हेंच भारत भूषण ॥ ६८ ॥

भाषा इंग्रजी वाघीणीचें दूध वाघीणला करूं ठार ॥
देऊं लढा साहेबाशीं जो श्रमिकाशीं छळतो फार ॥ ६९ ॥

डॉक्टर प्राचार्य, आचार्य, कलाकार, प्रचारक, कारभारी ॥
अशांतता, विषमता, गुलामगीरीचें मूळ वदणार वैरी ॥ ७० ॥

आम्हां नको देशबुडव्यांचे दर्शन, साहित्य, निरोबंसरीवाला ॥
अंधश्रद्धा, अंधभक्तिचे प्रेरणेने नागवीले कोटी कोटीला ॥ ७१ ॥

कष्ट करा पोट भरा श्रमजीवी, बुद्धिजीवी एक नव्हे प्रचार
करा ॥
श्रमिक सारे एक एकी करा फेर धरा आनंदाने नृत्य करा ॥ ७२ ॥

कवि भोजराजाची कविता भाजी भाकरी आहे ॥
श्रमिकासाठींच अन्न हेंच परब्रह्म ठरलें आहे ॥ ७३ ॥

# ॥ कवितांजली ॥

बहुरंगी, नानाढंगी रोमरोमी मराठी साहित्य रंगले ॥
जीवन कलेचा कलह षड्रिपू जिंकीत वारकरी जीवन संपले ॥ १ ॥

दोन खावे चार द्यावे मराठी जनतेसाठीच कष्ट साहीले ॥
जीवाशीवाचे गांठी भेटीतून हास्यरसाचें पूर वाहिले ॥ २ ॥

श्रमिकांचा भ्राता, दलितांचा त्राता, पतितांचा होता सखा ॥
उकिरड्यांतील माणीक शोधतांना गरिबांचा ठरला पाठीराखा ॥ ३ ॥

शक्तिबुद्धिचे आगर, प्रेमभक्तिसागर, शेटजी राज्यासाठी कर्दनकाळ ॥
साम्यवादी आय्या, शेतकरीभय्या, श्रमिकांची नय्या होते चालवीत सांजुसकाळ॥ ४ ॥

सच्चा ब्राह्मण, वेदमूर्ति, साहित्यस्फूर्ति, महामहर्षि धर्म राजकारण धुरंधर ॥
समता, त्यागी, सचोटी, कसोटी, सौख्यानंदी, भोगी मस्त कलंदर ॥ ५ ॥

मराठी भाषेचे पुत्र, पौत्र, महाराष्ट्र सारेच सारे हो रडले ॥
कोटी किसान मजूर रडतात धाय धाय जे घडू नये तेच घडले ॥ ६ ॥

उठा श्रमिकांनो नका रडू पूसा नयन करा स्वच्छ कोरडे ॥
कवि भोजराज आचार्यांना वहातो कवितांजली श्रमिक चालला पुढे पुढें ॥ ७ ॥

# मो. मि. पाटील ह्यांचें प्रकाशित वाङ्मय

१ अदलाबदल ( कादंबरी ) किंमत ३ रुपये

२ काळी साखर ( कथासंग्रह ) किंमत २ रुपये

३ पंचामृत ( कथासंग्रह ) किंमत २ रुपये

४ चौरंग ( कथासंग्रह ) किंमत ३ रुपये

५ अमरगीत ( कविता संग्रह ) किंमत १—५० रुपये

६ राधा-कृष्ण गीत ( कविता संग्रह ) किंमत ३ रुपये

## अप्रकाशित वाङ्मय

१ आम्हीं पाहिली मुंबई २ पोलीसशी गाठ ३ लेखकमहाशय ४ कोकिळा

५ राधा मोहन ६ खानदान ७ प्रजासत्ताक भारत व लोकशाही समाजवाद ८ रामनामकी धून ९ भोजराज नीति १० राम जोशी

## आगामी वाङ्मय

१ अंवल गांवचा दरवडा २ ऑल्बेल बराबर है ऽ

३ आमुची व्यायाम शाळा ४ खटारा ५ उकीरड्यांतील माणिक

६ पुण्याची पाहुणी ७ गीतासार ८ माकड सेना

९ केशव सूत १० सुरतची मुरत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ग्रंथालय
अनुक्रम 2005 वि: काव्य
2968 नों: दि 23/7/91
REFBK-0020044
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 2005



# भो. मि. पाटील ह्यांचें प्रकाशित वाङ्मय

१ अदलाबदल ( कादंबरी ) किंमत ३ रुपये
२ काळी साखर ( कथासंग्रह ) किंमत २ रुपये
३ पंचामृत ( कथासंग्रह ) किंमत २ रुपये
४ चौरंग ( कथासंग्रह ) किंमत ३ रुपये
५ अमरगीत ( कविता संग्रह ) किंमत १-५० रुपये
६ राधा-कृष्ण गीत ( कविता संग्रह ) किंमत ३ रुपये

## अप्रकाशित वाङ्मय

१ आम्हीं पाहिली मुंबई २ पोलीसशी गांठ ३ लेखकमहाशय ४ कोकिळा
५ राधा मोहन ६ खानदान ७ प्रजासत्ताक भारत व लोकशाही समाजवाद ८ रामनामकी धून ९ भोजराज नीति १० राम जोशी

## आगामी वाङ्मय

१ अंचल गांवचा दरवडा २ ऑल्‌वेल बराबर है ऽ
३ आमुची व्यायाम शाळा ४ खटारा ५ उकीरड्यांतील माणिक
६ पुण्याची पाहुणी ७ गीतासार ८ माकड सेना
९ केशव सूत १० सुरतची मुरत